प्रकरण २

बालपण आणि शिवसाक्षात्कार

शिवसाक्षात्कार व क्षेत्रपरिकल्पना १२ व्या शतकात कलचुरी घराण्याचे राज्य असले तरी सोन्नलगीचा राजा आणि राणी चामलादेवी हे अधिपती होते, रेवणसिद्ध आल्याचे राणीला कळताच निरोप देऊन चामलादेवीने रेवणसिद्धांना आपल्या वाड्यावर बोलावले आणि राजवाड्यात भाविकांची गर्दी जमली. सर्वांनी रेवणसिद्धांचे दर्शन आणि भोजन प्रसाद घेतला. आणि राणीचे गुणगान करीत नाथाचा जयजयकार करीत परतले.

रेवणसिद्ध परत निघण्याच्या तयारीत असताना चामलादेवीने श्रीच्या चरणी साष्टांग प्रणिपात केला आणि उत्सुकतेने विचारले, ''महाराज ! त्या वयस्कर पाटलांच्या उदरी शिवरूप सिद्धयोगी जन्म घेणार असल्याचे ऐकले हे खरे आहे का ?'' स्मित हास्य करीत रेवणसिद्ध यतिवर्य वदले, ''बाळे ! परमेश्वराची करणी अजब आहे. केव्हा काय घडेल हे तोच जाणो, पण हे सत्य आहे का, विश्व चैतन्याचा गाभा उन्नत सिद्धपुरूषच, तुझ्या गावात अवतार घेणार आहे. जन्मलेल्या बाळाचे, '' सिद्धराम'' असेच नामकरण करण्यास मी बजावले आहे'' असे सांगताना रेवणसिद्धांचे नेत्र एका अनामिक तेजाने तळपत होते, असा उल्लेख आढळतो. चामलाराणी, पाटील पती पत्नी, आणि सोन्नलगीवासी भक्तांनी रेवणसिद्धांना भावपूर्ण निरोप दिला. त्यांनी आपल्या शिष्य परिवारासह श्रीशैल क्षेत्राकडे प्रस्थान केले. पाटील पती पत्नी आनंदाच्या आवेगात जागीच खिळल्यासारखे झाले होते. सुग्गला आणि मुद्दगौडांना ही सर्व घटना स्वप्नात घडल्याप्रमाणे वाटत होती.[१]

जन्म : मुद्दगौडा आणि सुग्गलाव्वा यांना सिद्धराम मुलगा जन्माला येणार असा पूर्ववृत्तांत झाला होता. आपल्याला मातृत्व प्राप्त होणार म्हणून आनंदून जात असे पण आपले मासिक धर्म थांबले आहेत तर आपल्याला अपत्य कसे होणार या गोष्टीनेही ती अत्यंत चिंतित होत असे. पुन्हा महायोगी रेवणसिद्धांचे भविष्य खोटे कसे होणार ? असा ती विचार करीत असे अशातच दिवसांमागून दिवस जात असताना तिला आपल्यामध्ये काही फरक होत असल्याचे जाणवू लागले. पाचव्या महिन्यातच तिला गर्भ सात महिन्याचा असल्यासारखे वाटत होते. इतर स्त्रियांना ज्या वेदना होतात. ज्या काही भावना वाटतात, तसे काही सुग्गलाव्वाला वाटत नसे.[२] विकार, विषय आणि वासनारहित असलेले वृद्धत्व जवळ येत होते, सिद्धरामेश्वराच्या जन्मास साजेसे क्षेत्र होते. विटाळ नसलेला पुण्यगर्भ दिवसामासी वाढत होता.[३] सिद्धरामेश्वरांचा जन्म सामान्य माणसासारखा झाला नाही. ती एक असामान्य घटना म्हणून

राघवांकानी कल्पित केली आहे.[४] सातवा महिना भरला होता पण नऊ महिने भरल्याप्रमाणे तिचा गर्भ वाढला होता. सुग्गलाव्वाला एकीकडे चिंता वाटायची आणि दुसरीकडे मातृत्व लाभणार म्हणून ती सुखावून जायची. अन्य स्त्रियांचा गरोदर काळ हा यातनामय असतो. परंतु सुग्गलाव्वा या सर्वापासून मुक्त होती. रोजच्याप्रमाणे सुग्गलाव्वा शिवध्यान करीत निद्रावश झाली होती. पहाटेच्या वेळी अर्धजागृत अर्धनिद्रावस्थेत असताना तिला एक दृश्य दिसले. पौष महिना. थंडीचे दिवस होते, भल्या पहाटे ब्राह्मी मुहूर्तावर आभाळातून एक असामान्य अमृतशिले समान धवलकांती असलेल्या-बाळाला आपल्या हृदयाशी धरलेली, कपाळावर विभूती धारण केलेली, हाती गळ्यात रुद्रांक्षांच्या माळा घातलेली एक देवता पाटलांच्या घरी आली. तिच्या बरोबर आणखी कांही जणी सोबत होत्या. ही देवता म्हणजे पार्वती होय. ही देवता तेथे येऊन अंतराळात पाळणा बांधून, अंगाई गीत गाऊन त्या बाळाला ''सिद्धराम'' असे नामकरण करून त्या अदृश्य झाल्या.[५] वरील दृश्य संपले. तिच्या कानी ॐ कार नाद घुमत होता. सारे जग झोपले होते. पण मातेच्या उदरातील योगी मात्र जागा झाला होता. आपले बाळंपतण कसे होईल? या चिंतेने सुग्गलाव्वा घाबरली. पण आश्चर्य असे की, जीव घेण्यासारखी प्रसववेदना नाही. थरथर कापली नाही की घामेजली नाही, देहसुद्धा शिणला नव्हता. अत्यंत सुलभपणे तिने बाळाला जन्म दिला होता. रेवणसिद्धांचा निरोप घेत असताना त्या दिवशी रेवणसिद्धांनी पाटलांच्या हाती रुद्राक्ष आणि भस्म देऊन बाळ जन्मल्याबरोबर त्याच्या कपाळी भस्म लावून बाळाला रुद्राक्ष बांधण्यास सांगितले होते. म्हणून त्याने लगेच बाळाला भस्म लावून रुद्राक्ष धारण करताच बाळाने डोळे उघडले. (सोलापूरातील गुरुवार पेठ येथे शिवसिद्धरामांचे जन्मस्थळ असून त्यावर देवालय बांधलेले आहे. थोड्याच अंतरावर योगीवरेण्य रेवणसिद्ध यांच्या पादुका असलेले मंदिर आहे. ह्या जागीच मुद्दगौडा पाटलांचे घर होते).

वृद्धापकाळात मुले, संतती होणे शक्य नाही असे म्हणणाऱ्यांना या शतकातील उदाहरण. सोलापूर येथील संगमेश्वर महाविद्यालयातील हिन्दी विभागप्रमुख प्राध्यापक, आताचे सोलापूर विद्यापिठाचे कुलगुरू डॉ. इरेश स्वामी सरांनी पाहिलेली एक सत्य घटना - श्री स्वामी तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी महाविद्यालयात ते प्राध्यापक होते तेव्हाची ही सत्यकथा - (सुमारे १९८० साली) तुळजाभवानी मंदिरात होमकुंडाच्या जवळ देवीच्या पितळी पादुका आहेत. आताही त्या तेथेच आहेत. त्याठिकाणी वृद्ध पतिपत्नी पुजारी दाम्पत्याचे वय ६० वर्षाच्या पुढे होते. त्यांना मूलबाळ नव्हते. पण आश्चर्य असे की, त्या वयात त्यांना पुढे दोन मुले झाली. पहिले मूल अडीच - तीन वर्षाचे असताना खेळत मंदिराच्या प्रांगणात संबळाजवळ गेले आणि सराईतपणे मोठी व्यक्ती वाजविते तसे ते संबळ वाजवू लागले. हे सर्व त्या मुलाने आईच्या गर्भात संस्कार प्राप्त केले होते त्यामुळेच असू शकेल. कारण मंदिराच्या मागील बाजूस नेहमी जागरण गोंधळ चाले आणि त्या ठिकाणी गोंधळी संबळ वाजवीत. तो आवाज

आईच्या गर्भात त्या मुलाने आत्मसात केला असावा.[६] सिद्धराम दैवीपुत्र व शिवापुरा, शिवमया म्हणजे जगाला भूल पाडणारे होते म्हणून राघवांक सांगतात तसेच असे जन्म म्हणजे शिवशरणांचे जीवनाचे शेतच असते असे हरिहर सांगतात. येथे आपणासही असे समजावे लागेल.[७] बाळाचा जन्म झाल्याची वार्ता वाऱ्यासारखी पसरली. त्याच्या नाभीस नाळ नव्हती. तो श्वासोच्छ्वास करत नव्हता. मलमूत्रदिबाधा त्याला बाधतच नव्हत्या अशी विचित्र अवस्था त्या बाळाची होती. कोणीही काहीही बोलू लागले. त्या बालकाच्या मुखकमलाकडे अधिक बारकाईने पाहताच त्याच्या मस्तकावर शिवलिंगाकृती दिसली.[८] काहीजण कुलदैवतांचे नांव ठेवल्यास बरे होईल असे म्हणाले.

नामकरण : मात्र ते पाटलांचा थोरला मुलगा बोमण्णाला पसंत नव्हते.रेवणसिद्ध यतीने आज्ञा केली होती की, बाळाला 'सिद्धाराम' असेच नाव ठेवावे व तसे बजावले होते. बाळाला सिद्धराम असेच नाव ठेवावे असे बोमण्णाचे मत होते. रेवणनाथांची आज्ञा पाळावी असेच त्याचे म्हणणे होते. जमलेल्या बायकांनी आणि सुग्गलाव्वानेही सुखरुपपणे बाळंतिण झाल्यावर 'धुळीमहांकाळ' नाव ठेवण्याचा हट्ट धरला त्यामुळे नाईलाजाने बाळ राजाना 'धुळीमांकाळ' असेच नाव ठेवण्याचे ठरविले गेले आणि बाळाच्या नामकरणानिमित्त पाटलांनी जातिभेद न करता गावजेवण दिले. पाळणा पानाफुलांनी सजवीला मंगल वाद्ये वाजवीत जमलेल्या सुवासिनींनी बाळाला पाळण्यात घालून 'धुळीमहांकाळ' असेच नामकरण केले.[९]

बालपण : दिवसेंदिवस बाळ वाढू लागला. पण हे बाळ सामान्य मुलासारखे नव्हते. भूक लागली म्हणून कधी रडले नाही. काहीतरी विचारात मग्न असल्यासारखे दिसायचे. माता सुग्गला उशीर होईपर्यंत पाजायची नाही. बाळ भूक लागल्यावर तरी रडेल म्हणून. पण सांज हाऊ लागली तरीही बाळ रडायचा नाही. मातेचे काळीज चरफडायचे. ती आपणाहून बाळाला उचलून पदराखाली घ्यायची. बाळ स्तन चोखू लागला. माता आनंदली. बाळ रांगू लागला, उठून उभा राहू लागला, सावकाश चालायला शिकला.

शुभ्र अंगकांती, डोक्यावर दाट कुरळे केस, निळसर रंगाचे डोळे, सतत हसतमुख. अशा या बाळाला पाहताच बायकांना त्याला उचलून वात्सल्याने कवटाळल्याशिवाय राहवत नसे. वयापेक्षा अधिक वाढ होती बाळाला. तो कधीही कसलाही हट्ट करीत नसे. बालपणात सामान्य मुले काहीतरी मागून हट्ट करतात तसे सिद्धराम कधी काही मागत नसे. कधी हट्टही करत नसे. सामान्य बालकाहून हा बालक आगळा-वेगळा होता.[१०] घरामध्ये मुक्यासारखे वागत असलेल्या या बालकाला त्याच्या पित्यानी (मुद्दगौडा) गुरे राखण्यासाठी शेतात पाठविण्याचे ठरविले.[११] धुळीमांकाळ जन्मल्यापासून शेती चांगली पिकू लागली आणि पुढील भरभराटीची चिन्हे दिसू लागली होती.[१२]

गुरुभेट : सिद्धराम आठ वर्षाचा झाला. त्याच्या वयाच्या मुलापेक्षाही त्याची वाढ चांगली झाली होती. एके दिवशी रेवणसिद्धांचा शिष्य (मुलगा) रुद्रमुनी सोन्नलगी मुद्दगौडाच्या घरी आले. पाटलांनी

त्यांचे स्वागत केले. त्यावेळी येथे येण्याचे कारण विचारता रुद्रमुनी म्हणाले, ''योगीवर्य रेवणसिद्धांनी सिद्धरामाला अक्षरज्ञान देण्यासाठी मला तुमच्याकडे पाठविले आहे. त्यांच्या आज्ञेवरून मी तुमच्याकडे आलो आहे.'' तेव्हा 'कुडवक्कलीग वंशाचे लोक आम्ही, आम्हाला अक्षरज्ञान काय कामाचे?' असे पाटील म्हणाले, तेव्हा आण्णा बोम्मय्यानी गुरूंच्या आज्ञेचे पालन केले पाहिजे असे वडिलांना सांगितले. तेव्हा पाटलांनी संमती दिली. चार पाच मुलांना रुद्रमुनी शिकवीत होते. सिद्धरामाची स्मरणशक्ती, ग्रहणशक्ती विलक्षण होती. पण सर्व मुलांप्रमाणे आपला मुलगा खेळत नाही, बागडत नाही म्हणून माता-पित्यांना खंत वाटायची[१३], मग इतर मुलाबरोबर गुरे राखावयास (चरण्यास) पाठविल्यास त्यांच्या संगतीत तरी आपला मुलगा बोलण्यास शिकेल म्हणून बाळराजाला ते शेतात पाठवू लागले. तिथेही सिद्धराम कुणाबरोबर बोलत नव्हता, खेळत नव्हता. आईने दिलेली शिदोरी इतर मुलांना वाटून आपण एका झाडाखाली बसून शिवध्यान करीत असे, मोकळ्या निसर्गाच्या सान्निध्यात एकान्तात सिद्धरामाचे हे ध्यान सुरु झाले, घरून आणलेली शिदोरी शिवलिंगाला अर्पण करून सर्व मुलांना तो वाटत असे. असेच दररोज चालले, महिने सरले, ऋतू बदलले सिद्धरामाची साधना निर्विघ्नपणे चाललेली होती. लोकांच्या नजरेत तो वेडसर आणि मुका ठरला होता. त्याच्याकडे कोणाचेही लक्ष नव्हते. आपल्या आत्मानंदात सिद्धराम स्वत:ला विसरला होता.

एकदा नेहमीप्रमाणे सिद्धराम शेतात गेले असता तेथे एक घटना घडली. ही घटना जरी चमत्कारिक आणि आश्चर्यकारक वाटत असली तरी ती खरी आहे व त्या दिवसाची स्थिती राघवांकांनी वर्णिलेली आहे. त्यामुळे आपल्यालाही हे मान्य करावे लागेल.[१४] (सध्या जिल्हाधिकारी कचेरीजवळ मल्लय्या आणि सिद्धराम यांची प्रथम भेट झालेली आणि मल्लय्या बसलेले स्थान आहे. येथेच पाटील मुद्दगौडाचे शेत होते. इथेच सिद्धराम गोधन चरण्यास घेऊन जात असे. आता जंगम बसलेल्या स्थानाला 'नवणेश्वर लिंग' असे म्हणतात. आणि तेथे आता गुरुभेट म्हणून जे लिंग आहे ते हेच.[१५] हे लिंग ६५ लिंगांपैकी एक आहे, येथेच घडलेली ही घटना होय. याचा उल्लेख राघवांकानीही केलेला आहे.) ही घटना अशी, सुगीचे दिवस होते, शेतामध्ये भरपूर पीके आले होते. हुरडा तयार झाला होता, आपले ध्यान संपवून सिद्धराम उठले तेवढ्यात राळ्याच्या शेतातून 'सिद्धरामा' अशी हाक ऐकू आली. थोड्याच अंतरावर एका झाडाखाली मोठ्या दगडावर एक तेजस्वी पुरुष बसलेला दिसला. एक अनामिक विलक्षण शक्ती आपल्याला त्या योग्याकडे ओढून नेत आहे असे सिद्धरामांना वाटले. सिद्धराम त्यांच्या पायावर लोळत म्हणाले, 'देवा ! आता आलास । मी कितीतरी दिवसापासून तुझी वाट पाहत होतो !' अवचित त्यांच्या तोंडून हे शब्द बाहेर पडले. आलेल्या जंगमाने वाकून सिद्धरामांना उचलून हृदयाशी कवटाळले. अशा स्थितीत किती वेळ उभयता होते त्यांनाच कळले नाही. शेवटी जंगमाने 'सिद्धरामा, मला भूक

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

लागली आहे' असे म्टल्यावर सिद्धरामांनी युक्ती केली. त्यांना जवळील कांबळ अंथरून त्यावर बसावयास सांगितले स्वत: शेतात जाऊन ज्वारीच्या कणसांची पेंढी काढली आणि विस्तव पेटवून तो कणसे भाजू लागला. गरम गरम हुरडा देत सिद्धराम त्या योग्याला (जंगमाला) न्हाहाळू लागला. तेव्हा त्याला प्रत्यक्ष परमेश्वरच समोर बसल्या सारखे वाटत होते. तेव्हा त्यांनी योग्यास नाव, कोठे राहता? हे सर्व प्रश्न विचारले. सिद्धरामांना त्या योग्याने आपले नाव 'मल्लय्या' आहे आणि आपण श्रीशैल गिरीशिखरावर राहतो असे सांगितले. नंतर त्या योग्यानी सिद्धरामांना दही भात मागितला तेव्हा सिद्धराम म्हणाला, 'माझी शिदोरी तर संपली आहे. मी घरी जाऊन घेऊन येईपर्यंत तू इथेच बस ' असे सांगून तो घरी पळत गेला. रोजच्या पेक्षा लवकर घरी परत आलेल्या आपल्या मुलाला पाहून सुग्गलाव्वा चकित झाली. सिद्धराम 'अव्वा ! अव्वा !!' असे म्हणतच घरात आला आणि त्याने आईला दहीभात मागितला. कधीही न बोलणारा आपला मुलगा आज अव्वा म्हटल्यामुळे (अव्वा म्हणजे कन्नडमध्ये आई) सुग्गलाव्वाला खूप आनंद झाला. तिचा आनंद गगनात मावेनासा झाला तिने पटकन भरपूर दहीभात दिला तेव्हा सिद्धराम तो घेऊन उड्या मारीत तिथून निघून गेला. दहीभाताचे गाठोडे हाती घेऊन सिद्धराम धावतच शेतात आला. तेव्हा मल्लय्यासाठी अंथरलेले कांबळे त्याला रिकामे दिसले. जंगम जवळच आसपास कुठेतरी गेले असतील म्हणून सिद्धराम मोठ्याने 'मल्लय्या' म्हणून हाका मारु लागला. पण कोठेही मल्लय्या दिसले नाहीत, तेव्हा सिद्धराम 'मल्लय्या, मल्लिनाथा' म्हणून शेतात सर्व बाजूने शोधू लागला. त्याचा जीव कासावीस होऊ लागला. अंधार पडू लागला. मग मात्र सिद्धरामांना राहवेना, त्यांचा जीव व्याकूळ झाला. गळा दाटून आला. डोळ्यातून अश्रू वाहू लागले. 'तू परत येईपर्यंत मी इथेच बसतो म्हणून मला का फसविले, माझ्या हातून काय चूक झाली? म्हणून तो जोर-जोरात रडू लागला, ओरडू लागला, जमिनीवर लोळू लागला, वेड्यासारखे चोहीकडे फिरुन तो थकला. त्या कोवळ्या हाता पायांना दगड, धोंडे, काटे टोचून रक्तबंबाळ झाले होते. तरी त्याचे लक्ष त्याकडे नव्हते. त्याचे चित्त फक्त मल्लय्याला शोधण्यातच होते.

ही सिद्धरामाची पहिली भेट 'गुरुभेट' ठरली. या पहिल्या दिवसाचे वर्णन राघवांनी वर्णिले आहे त्याप्रमाणे वर सांगितले आहे. अति लहान वयात सिद्धरामांना परमेश्वर साक्षात्कार झाला असे समजते. राळ्याच्या शेतात, निसर्गाच्या सुंदर सान्निध्यामध्ये, परमेश्वरांने त्याचे विश्वव्यापी रूप सोडून जंगमरूपात दर्शन दिले.[१६] बालपणात केलेल्या शिवभक्तीमुळे अतिशीघ्रतेने सिद्धरामांना शिवसाक्षात्कार झाला. या शिवसाक्षात्काराच्या प्रवासाचे वर्णन राघवांकाने अति तन्मयतेने केले आहे. त्यांनी वर्णिलेले सिद्धरामांचे भक्तिसाधन आणि त्यांना झालेले साक्षात्कार ही सिद्धरामांच्या जीवनाची एक बाजू. त्यांच्या बालजीवनाला आणखी एक बाजू आहे. अशी राघवांकांची त्यांच्या जीवनाकडे पाहण्याची दृष्टी आहे.

सिद्धरामांनी या कालावधीतच विद्याभ्यासाची लौकिक साधने प्राप्त केली असावीत. [१७] त्यांनी अडुसष्ट हजार वचने लिहिलेली आहेत. हे त्यांच्याच एका वचनातून व्यक्त होते.

'अडुसष्ट सहस्त्र वचने गाऊनि शिणलें माझे मन ।
गावें एकच वचन, परिसावें एकच वचन ॥
विषय सांडुनि निर्विषयी व्हावे हें एकच वचन ।
कपिलसिद्ध मल्लिकार्जुन ॥ [१८]

सुप्रसिद्ध बसवण्णा, अल्लमप्रभु, अक्कमहादेवी, चन्नबसव यांच्या मध्ये आपले वचन एवढेच नव्हे तर वेदआगमांचा उपयोग करून आपल्या काही वचनात न संपणारे पांडित्य सिद्धरामांनी प्रकट केलेले आहे. यामुळे सिद्धरामाने विद्याभ्यासात उचित असलेली विद्या बाल्यावस्थेतच प्राप्त केली असावी असे दिसते. [१९] आत्मकल्याणच नव्हे तर लोककल्याण साधावे म्हणून परमेश्वर सिद्धरामेश्वरांना क्षेत्र परिकल्पना, लिंगस्थापना अशा अनेक रुपात कर्मयोगाच्या दीक्षाही घेऊन देतात. [२०]

श्रीशैलास प्रयाण – 'मल्लय्या । मल्लिनाथ ॥' असा आक्रोश करीत असताना सिद्धराम जमिनीवर कितीवेळ पडून राहिले, लोळले हे त्यांनाही कळले नाही. इकडे गावात मात्र आईवडील आपला मुलगा शेतातून अजून परत आला नाही म्हणून फार चिंताग्रस्त झाले होते. घरी हाहाकार माजला. दुपारी झालेला दहीभाताचा प्रकार सुग्गलाव्वाने नवऱ्याला सांगितला. आणि ती रडू लागली आई - वडील दोघेही दु:खी असलेले पाहून अण्णा बोम्मय्याने आईला धीर दिला 'तू रडू नकोस, मी सिद्धरामाला शोधून आणतो', असे सांगितले. तो थोडा वेडसर असल्यामुळे कुठेतरी वाट तर चुकला नाही ना म्हणून सिद्धरामाला शोधायला बोम्मय्या निघाला.

शेतात पहाटेचा थंड वारा वाहू लागला, तेव्हा सिद्धरामाचा थकवा कमी झाला तरी तो मल्लय्याची आठवण काढीत लोळत होता. इतक्यात लांबून 'महंत मल्लय्या उधे' असे शब्द सिद्धरामाच्या कानावर पडले. 'श्रीशैल मल्लय्या' या शब्दाने सिद्धरामाला आशा वाटू लागली, कावड घेऊन जात असलेले लोक जवळ आले. एक लहान वयाचा, सर्व अंग धुळीने माखलेला, केस विस्कटलेल्या स्थितीतला मुलगा पाहताच त्यांना त्या मुलाची दया आली. तेव्हा आई वडिलांना सोडून आलास का ? किंवा तुझ्या आई-वडिलांची आणि तुझी चुकामूक झाली आहे का ? असे प्रश्न त्या मुलाला विचारले. तेव्हा तो मुलगा सांगू लागला, मला श्रीशैल मल्लिनाथाकडे जायचे आहे ! आणि शेतात जंगम भेटल्याची सर्व हकिकत त्या कावडधारी (श्रीशैलला निघालेल्या) लोकांना सांगितली. तेव्हा ते लोक 'चल, तुला श्रीशैल मधील मल्लय्या दाखवितो' असे म्हणून त्याला आपल्याबरोबर घेऊन निघाले. सोन्नलगीहून श्रीशैलचा प्रवास शेकडो मैल अंतराचा आहे. पण सिद्धरामाला कधी थकवा आला नाही. रस्त्यात त्याला कोणीही खायला,

प्यायला देत असे. तो मात्र कुणाकडे काहीही मागत नसे. रस्त्यात त्यांना एका बाईने दहीभात खायला दिला तेव्हा त्यांना मल्लय्याची आठवण झाली आणि तो पुन्हा न खाता रडत पळू लागला. तेव्हा हा मुलगा असा का वागतो ? हे कोणाच्याही लक्षात येत नसे. पण त्या मधील लोकनाथांनी सिद्धरामाची स्थिती, त्यांच्यात असणाऱ्या सुप्तावस्थेतील दैवी शक्ती ही कदाचित ओळखली होती. त्यामुळे ते सिद्धरामाच्या पाठोपाठ जात होते. लोकनाथांबरोबर सिद्धराम श्रीशैलजवळ गेले. लांबूनच श्रीशैलचे गिरीशिखर दिसू लागले. तेव्हा 'हेच श्रीशैल मल्लिनाथांचे गाव' हे शब्द ऐकताच सिद्धरामांच्या अंगी नवचैतन्य निर्माण झाल्यासारखे वाटले. आता मात्र आपल्याला मल्लय्या भेटणार या आशेने सिद्धरामांचे मन जरासे शांत झाले.[२१]

श्रीशैल दर्शन : मल्लीकार्जुनाच्या देवालयाचे शिखर दिसू लागले तेव्हा लोक जयजयकार करत पुढे निघाले तेव्हा, 'माझा मल्लय्या देवळात राहतो काय?' असे सिद्धरामांनी विचारले. 'होय' म्हणून उत्तर मिळाल्यावर तो देवळात, 'मल्लय्या, मल्लय्या मल्लिनाथा' म्हणून हाका मारु लागल्यावर लोकांनी त्यांना देवळाच्या गाभाऱ्यातील ज्योतिर्लिंगाकडे हात करून, 'हाच तुझा मल्लय्या', असे सांगितले. तेव्हा पुन्हा सिद्धरामांना दुःख वाटले. 'हा आपला मल्लय्या नव्हे. हा तर दगडाचा आहे, माझा मल्लय्या तर जिवंत होता' असे सांगू लागले. 'माझा मल्लय्या बोलणारा, चालणारा होता. त्याने भगवी कफनी घातली होती, कपाळावर भस्माचे पट्टे होते, गळ्यात रुद्राक्षांच्या माळा होत्या, हाती कमंडलू, पायी खडावा होत्या आणि तो तेजस्वी होता. हा तर दगडांचा आहे. हुरडा खाणारा, दहीभात मागणारा, प्रेमाने माझ्याशी बोलणारा मल्लय्या मला हवा ' म्हणून तो पुन्हा रडू लागला. 'पुन्हा एकदा मल्लय्याने मला फसविले', असे तो म्हणू लागला. तेथून प्रत्येक ठिकाणी तो मल्लय्याला शोधत सुटला.[२२] श्रीशैलास गेल्यानंतर निराशेवस्थेत ते म्हणतात,

'देव असा म्हणूनि कशी ठेवू निष्ठा,
मज येण्या सांगुनि परतून जावे कां?
देव असा म्हणुनी कशी ठेवूं निष्ठा
लावी कसोटीस आपुल्या कार्यालागी
तुझी लीला कोणा उमजेना कपिलसिद्ध मल्लय्या।'[२३]

'मल्लय्याने मला फसविले' म्हणून तो मोठ्याने रडत मल्लय्याला शोधू लागला. दुःख न आवरल्यामुळे सिद्धराम दाट जंगलात शिरला तेथील झाडी-वेली, फळे-फुले, पशु-पक्ष्यांना आणि तेथील वनश्रीला विचारु लागला, 'तुम्ही तरी माझ्या मल्लय्याला पाहिले काय?' असा आक्रोश करीत शेवटी 'मल्लय्या जर मला आज नाही भेटला तर या देहाला जगण्याचा काय अधिकार? मल्लय्याचे दर्शनाशिवाय

आपण जगून काय उपयोग. ज्याने हा देह दिला तो त्यालाच अर्पण करावा' असा दृढ निश्चय केला.[२४] त्याने आपल्या देहाचा त्याग करण्याचे ठरवून तो 'कमरी कोळ्ळ' जवळ आला. (कमरी-कोळ्ळ म्हणजे खोल दरी. आजही पाहणाऱ्यांचे डोळे तेथे गरगरतात.) तेथून उडी घेऊन प्राणत्याग करावा असा विचार करीत तेथे थांबला. ज्या ठिकाणी उभे राहून सिद्धरामांनी शोक केला त्या ठिकाणाला 'नयनगुंड' असे म्हणतात.[२५] (सिद्धरामाने ज्या जागेवर उभारून शोक केला. त्या ठिकाणी आजही डोळ्यातून पाणी गळावे त्याप्रमाणे थेंब थेंब पाणी गळते. त्या स्थानाला 'नयनगुंड' असे म्हणतात. हिवाळा, उन्हाळा, पावसाळा या तीनही ऋतूत एकाच प्रकारे थेंब थेंब पाणी गळते, तेथील पाणी गोड आहे.) सिद्धरामांनी मल्लय्यासाठी शोक केल्याची ही एक साक्ष आहे. 'मल्लय्या ऽऽऽ मल्लिनाथा ऽऽऽ' असे आर्त होऊन मोठ्या आवाजात ओरडून दरीत उडी टाकणार इतक्यात 'सिद्धरामाऽऽ ' अशी प्रेमळ हाक ऐकू आली आणि सिद्धरामांना मागे ढकल्यासारखे झाले. मल्लय्याला वेडा होऊन शोधणाऱ्या सिद्धरामाला सगुण साक्षात्कार झाला.[२६] अशा प्रकारे पुन्हा एकदा शिवसाक्षात्कार झाला म्हटले जाते. अशा प्रकारे बाल्यावस्थेतच सिद्धरामांना शिवसाक्षात्कार झाला असे कवी राघवांक सांगतात.[२७]

श्रीशैल पर्वतावर परमेश्वराची आज्ञा घेऊन काळभैरवाने धुळीमहांकाळ याला बरोबर घेऊन एक एक चमत्कार दाखविण्यास आरंभ केला. अनेक प्रकारचे चमत्कार पाहत पाहत चालले तेव्हा धुळीमहांकाळ उदयताडावर चढले, त्यांनी विष प्राशन केले, ते मोहिनी गजावर बसले आणि अग्निसमुद्रातून फिरून आले. याप्रमाणे काळभैरवाने परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे, धुळीमहांकाळाला श्रीशैलावर दोनशे कोसपर्यंत फिरवून नाना चमत्कार दाखवून त्याला परमेश्वरापाशी आणले. परमेश्वरांनी त्याला विचारले,''श्रीशैलावर काय-काय चमत्कार पाहिलेस?'' तेव्हा त्याने उत्तर दिले, 'हे परमेश्वरा, मला चमत्कारिक वस्तू काहीच नजरेस पडल्या नाहीत. 'उलट सिद्धरामच म्हणतात,'परमेश्वरा, ज्याने साक्षात अमृत प्राशन केले त्याला मधाची गोडी काय वाटणार आहे? कारण, साक्षात आपले रूप पाहिल्यावर या जगात दुसरा पाहण्यास चमत्कार असा कोणता आहे ? ब्रह्मदेवांनी कितीही खटपट केली तरी आपले रूप त्याचे दृष्टीस पडणे फारच दुर्मिळ आहे, असे आपले रूप जर मला आपण दाखविले, तर हे परमेश्वरा, दुसरा कोणता चमत्कार पाहण्यासारखा आहे?' हे ऐकून परमेश्वर फार संतुष्ट होऊन म्हणाले, 'हे धुळीमहांकाळ, तू आता देवांचा आणि इतर देवांचा गुरु झाला आहेस, तथापि तुला कोणी गुरु पाहिजे आहे, तर मी तुझा गुरु होतो आणि तुला उपदेश करतो' अशा प्रकारे सिद्धराम सर्वांचे गुरू झाले. म्हणून सिद्धरामांना दीक्षा दिली जाते ते असे -

सिद्धरामास दीक्षा : श्रीशैल पर्वतावर मुख्य देऊळ मल्लिकार्जूनाचे आहे. त्याच्या चारी दिशेस चार देवळे-एक पार्वतीचे, दुसरे नंदीचे, तिसरे भृंगीचे आणि चौथे वीरभद्राचे आहे. त्यांवरील जे कळस

तेच चार कळश आणि मध्ये जे मल्लिकार्जुनाचे देऊळ आहे त्यावरील जो कळस तोच गुरुकलश कल्पून सिद्धरामेश्वराच्या मस्तकावर जो टेंगूळ होता तेच त्याचे लिंग असे परमेश्वरांनी त्यांना दाखवून त्यांना पंचाक्षरी मंत्र दिला. भक्ती हीच गुरूदक्षिणा समजून गुरूने त्यांचे नाव 'सिद्धरामेश्वर' सांगून तू सर्व प्राण्यावर दया करावी असा नियम घालून दिला. [२८] आणि सोन्नलगीला परत जाण्याची आज्ञा परमेश्वरांनी दिली पण सिद्धराम मल्लय्याला सोडून येण्यास तयार नव्हते. तेव्हा, मल्लय्या 'मीही सोन्नलिगीला येतो' असे म्हणाले. तेव्हा सिद्धराम तयार झाले. लोककल्याण, आत्मकल्याण साधावे म्हणून परमेश्वराने सिद्धरामांना क्षेत्र परिकल्पना आणि लिंगस्थापना, तसेच कर्मयोगाची दीक्षा देऊन पाठविले.[२९] मल्लिकार्जुनाने सोन्नलगीत कायम राहावयास यावे या अटीवर सिद्धरामेश्वर सोन्नलगीस परत येण्यास तयार झाले. या सर्व घटना घडेपर्यंत अण्णा बोम्मय्या सिद्धरामांना शोधत येत होता. त्याला रस्त्यात सिद्धराम श्रीशैलास गेल्याचे कळाल्यामुळे तो प्रत्येक गावात विचारपूस करीत करीत शेवटी श्रीशैलास आला. शेवटी त्या दोघांची भेट झाली आणि त्या दोघांनी सोलापूरास परत येण्याचे ठरविले.[३०]

श्रीशैलावर घडलेल्या या कथेची आजचे हे साक्ष म्हणजे (आजही पाडव्याच्या आदल्या दिवशी रात्री म्हणजे अमावस्येच्या रात्री, सोलापूरच्या भक्तांकडून श्रीशैल येथे मल्लिकार्जुनास अभिषेक पूजा करण्यात येत असते. त्यावेळी तिथे दुसऱ्यांना प्रवेश नसतो. हे सोन्नलगीवर सिद्धरामांची कृपा असल्याचे द्योतकच म्हणावे लागेल.)[३१] अण्णा बोम्मय्या समवेत सिद्धयोगी परत सोन्नलगीस निघाला. वाटेवरील गावात योगीराजांचा सत्कार करण्यात येत होता. जाताना वेडसर वाटत असलेला मुलगा परत येताना त्याच्यात झालेले परिवर्तन पाहून, सिद्धरामाचे शिवतेज पाहून गावातील लोक आश्चर्यचकित होत होते. सोन्नलगीजवळ येत असताना सिद्धराम अधिकच अंतर्मुख झाला होता. घराकडे न जाता तो प्रथम शेताकडे गेला. तेथे असलेल्या शिवलिंगाजवळ जाऊन नंतर मल्लय्याने दर्शन दिलेल्या शिलेजवळ जाऊन बसला. 'ही शीला नव्हे तर पवित्रस्थान आहे, लिंग आहे' असे म्हणत तो तिथेच बसला. सिद्धरामाच्या डोळ्यापुढे त्या दिवशी घडलेली घटना सरकत होती.

सोन्नलगीत प्रवेश – सिद्धरामांना पाहून मुद्दगौडा पाटलांचा स्वत:च्या डोळ्यांवर विश्वास बसेना. भगवी वस्त्रे नेसून बसलेल्या त्या बालयोग्याकडे त्यांनी पाहिले आणि 'हाच सिद्धराम आहे का ? स्वामी झाला का रे ?' असे पाटील बोम्मण्णास विचारु लागले. त्या आवाजाने सिद्धराम डोळे उघडून उभा राहिला, सिद्धरामाना मुद्दगौडाने मिठी मारली आणि सर्वजण मिळून गावाकडे निघाले. पाटलांच्या घरासमोर बरेच लोक जमले होते. सिद्धराम घरात आलेला पाहून सुग्गलाचे ऊर भरुन आले आणि ती थरथरत्या आवाजात विचारु लागली, 'तू आलास का ? माझ्यावर रागावला होतास का ?' तेव्हा अण्णा बोमय्याने सांगितले ,'अव्वा, तो तुझा मुलगा असला तरी सिद्धराम आता बालयोगी झाले आहेत.'

बालयोगी सिद्धरामांची कीर्ती दिवसेंदिवस वाढू लागली. तसे गावातील दुष्ट प्रवृत्तीचे लोकही जळू लागले. त्याचा प्रभाव वाढत होता. यामुळे 'देवाचा कोप पाटलांवर, गावावर झाल्याशिवाय राहणार नाही मुलांपुढे पाटलांचे कांहीच चालेना, या गावाचा विनाशकाल आल्याशिवाय राहणार नाही.' असे मत्सर भावनेने जळणारे लोक निंदा करु लागले. पण सिद्धराम मात्र सर्व जातीतील लोकांना समानतेने वागवीत होते. त्यामुळे जातीयवादी लोक चिडले होते, खालच्या वर्गातील लोकांना सिध्दराम प्रेमाने वागवीत होते म्हणून वरच्या वर्गातले लोक जळत होते. या विषयी पाटलांना टोचून बोलत. असे बोलणे एक दोन वेळा सिद्धरामाच्याही कानावर पडले.[३२] आपल्यामुळे आपल्या वृद्ध आईवडिलांना त्रास होऊ नये, या विचाराने सिद्धरामांनी घर सोडण्याचे ठरविले. गावाबाहेर एक कुटी बनवून राहण्याचा विचार केला.[३३] आणि म्हणून अण्णा बोमय्या समवेत सिद्धयोगी परत सोन्नलगीस आल्यानंतर त्यांनी गावाबाहेर आश्रम बांधला आणि तेथेच ते वास करु लागले.[३४]

श्रीशैलवरुन परत आल्यानंतर सोलापूरला विसरलेल्या सिद्धरामाने थोड्या दिवसातच घरदार, आईवडील - हे छोटेसे जग सोडून मोठ्या विश्वात पाय ठेवले.[३५] असा उल्लेख आढळतो, सिद्धरामांच्या आयुष्यातील हे मोठे परिवर्तन म्हणजे साधी गोष्ट नव्हती. अण्णा बोम्मय्या रोज न चुकता बालयोग्याच्या भेटीला येत असे. सुग्गलाव्वा भेटून जात असे. आता लोक अधिक संख्येत सिद्धरामाकडे येऊ लागले. आपापली दु:खे कष्ट सांगत. तेव्हा सिद्धराम आलेल्यांची सांत्वना करुन, मार्गदर्शन करत. सर्व जातीचे, सर्व धर्माचे लोक इतकेच नव्हे तर खालच्या वर्गातील लोकही येत. आपल्याकडे येणाऱ्या सर्वांनाच समभावनेने पाहण्याची विशाल दृष्टी सिद्धरामेशांची होती, (आजही मकर - संक्रांतीच्या सणावेळेस समभाव दिसून येतो. जसे वेगवेगळ्या जातीतील लोकांना प्रतिनिधित्व दिलेले दिसून येते. हे नंदीध्वज पाच १) हिरेहब्बू २) देशमुख ३) माळी ४) फुलारी ५) सोनार आणि दोन नंदीध्वज दलितांचे असतात. यावरून समानतेची परंपरा सोलापूरात अजूनही दिसून येते.

लिंगपूजा :- आपल्या मुलाने धुळीमहांकाळास पुजावे, लिंगपूजेला आई वडील पूजु देत नव्हते त्यामुळेच[३६] सिद्धरामाने आपले आईवडील आणि घरदार सोडले यास सिद्धराम स्थापित लिंगाची पूजा करीत होते हेच कारण मानावे लागेल. जसे बसवण्णा आपले जन्मस्थान बागेवाडी सोडून त्यांच्या कार्यासाठी कल्याणाला गेल्याचे निदर्शनास येते. सिद्धरामांच्या जीवनातही असेच काही संदेश निर्माण होऊन हे विशाल असे मृत्यू लोक त्यांना बोलावले असेल असे कोट्टरशेट्टी एम.बी. सांगतात. अशा घरदार व आईवडील सोडलेल्या सिद्धरामाने गावाबाहेर एक मठ बांधून तेथील आपल्या कर्मयोगाच्या साधनेला सुरुवात केली. आपल्या बरोबर येणाऱ्या अण्णा - बोम्मय्याला दीक्षा देऊन स्वत: लोकोद्धाराची दीक्षा देण्यासाठी तयार झाले.[३७] त्यांच्या अलौकिक योगसामर्थ्याची कीर्ती सर्वत्र पसरली. ते लोककल्याणच्या

कार्यात नेहमी मग्न असत. [३८] कालांतराने सिद्धरामाच्या आईवडिलांचे एकाच वेळी देहावसान झाले तत्पूर्वी सुग्गलाव्वाने सिद्धरामांना बोलावून घेतले होते आणि त्यांच्या हातून विभूती लावून घेऊन डोळे मिटले. हे पाहून मुद्दोगौडा खोलीतून बाहेर पडले, भिंतीला टेकून बसले आणि त्यांनीही आपले प्राण सोडले. पाहणारे पाहतच राहिले. सगळ्यांना आश्चर्य वाटले. एकाच वेळेला नवरा - बायको उभयतांनी आपली इहलोकयात्रा संपविली होती.

ही बातमी समजल्यावर गावातील लोक जमले. शिवाय राणी चामलादेवीही सिद्धरामाच्या भेटीसाठी आल्या होत्या. काही दिवस घरी राहून सिद्धराम आपल्या आश्रमी परतले.

क्षेत्र निर्माण योजना :- आश्रमात राहून आपल्या कार्यास पुनश्च सुरुवात केल्यानंतर सिद्धराम क्षेत्र निर्माण योजना कशी करावी याविषयी रात्रंदिवस योजना करू लागले. प्रथम मल्लिकार्जुनाचे देवालय निर्माण करण्याचा विचार असल्याचे त्यांनी सांगितले. दुसऱ्याच दिवशी अनपेक्षितपणे चामलाराणी घोडागाडीतून सिद्धरामांच्या कुटीरापुढे उतरल्या. सिद्धरामापुढे नम्रपणे हात जोडून त्या म्हणाल्या, ''सिद्धरामेशा, तुमच्या क्षेत्र निर्माण कार्यासाठी जमीन देण्यासाठी मी इथे आले आहे. आज पहाटे गुरू रेवणसिद्ध यांनी दर्शन देऊन तुम्हाला लागेल तेवढी जमीन द्यावी म्हणून मला आज्ञा केली आहे. तुमच्या शेताला लागूनच आमची जमीन आहे. तुम्हाला जितकी हवी तितकी जमीन वापरू शकता. ही सेवा करण्याची संधी आपण मला द्यावी.'' असे सांगून चामलादेवी परत जाण्यास निघाल्या तेव्हा सिद्धराम म्हणाले, 'राणीसाहेब, आपण दिलेले दान सार्थकी लागेल धन्यवाद' असा उल्लेख सिद्धराम चरित्र (पृ.क्र. ३९-४०) मध्ये [३९] आहे. दुसऱ्या दिवसापासूनच क्षेत्र निर्माणाचे कार्य हाती घेण्याचा निर्धार सिद्धरामाने केला. तिन्ही बाजूने उंच, मध्यभागी खोल असलेली भूमी, गावाच्या पश्चिम दिशेला मल्लिकार्जूनाचे देवालय. त्यांच्या भोवताली तलाव निर्माण करण्याचा विचार असल्याचे सिद्धरामांनी बोम्मया आपल्या शिष्यवर्गापुढे सांगितले तेव्हा बोम्मय्या म्हणाला, ''मल्लिनाथाचे देऊळ व भोवती तलाव वगैरे निर्माण करणे शक्य आहे. पण पैसे कोठून आणायचे ? राणी चामलादेवीनी जमीन दिली आहे, पण पुढे?''



(सिद्धरामेश्वर मंदिर व तलाव परिसर)

सिद्धरामाने एक क्षण डोळे झाकून सावकाशपणे ते उघडले आणि म्हणाले, ''सोन्नलगीला भूकैलास करण्याची आज्ञा मल्लिनाथांची । त्यांची आज्ञा पालन करणे माझे कर्तव्य । त्याची इच्छा तोच पूर्ण करून घेणारा आम्हाला त्याची चिंता कशाला ?'' सिद्धरामांनी मंदिर बांधण्याच्या कार्याचा प्रारंभ केल्याची बातमी सोन्नलगीत पसरली. आजूबाजूच्या गावातही वार्ता पसरु लागली. लोक स्वइच्छेनेच सिद्धरामांच्या कार्यात सहभागी होण्यास येऊ लागले. एका शुभमुहूर्तावर स्वत: सिद्धयोगी यांनीच भूमीपूजन केले. त्यावेळी जमलेले लोक स्वत: होऊनच सहकार, सेवा हाती पहार घेऊन जमीन खणण्यास सुरुवात केली. जमलेल्या लोकांच्या तोंडून नकळत उत्स्फूर्तपणे जयजयकार घुमू लागला. बोमय्या आणि इतर लोकही जमीन खणू लागले. [४०] पाण्याची सोय करण्यासाठी, आलेल्या लोकांची तहान भागवावी म्हणून एक विहीर खणण्याचे काम हाती घेतले तेव्हा खोदण्याचे काम चालू असताना भूगर्भातून धन प्राप्त झाल्याचा [४१] उल्लेख आढळतो.

कपिलसिद्ध मल्लिकार्जुन देवालयाची स्थापना :– परमेश्वरांनी श्रीशैलमध्ये सांगितल्याप्रमाणे सोसाट्याचा वारा सुटला, गाढ अंध:कार पडला, विजा चमकू लागल्या. तितक्यात एक मंदाराचे झाड नजरेस पडले. झाड नजरेस पडताच सिद्धरामेश्वर त्या झाडाजवळ जाऊन बसले. तोच आतून ते:जपूंज शिवलिंग बाहेर आले असा उल्लेख आढळतो. [४२] तसेच ही कथा अशीही सांगितली जाते - चामलादेवीने भूमिदान केल्यानंतर सिद्धरामांनी क्षेत्र कल्पना करुन प्रथम मल्लिकार्जुन देवालयाचे बांधकाम हाती घेतले. ते पूर्ण होत आले. आता मल्लिकार्जुनाची प्रतिष्ठापना करण्याच्या चिंतनात सिद्धरामाचे मन गुंतले होते. संपूर्ण काळ्या रंगाचे वासरू ''कपिला''आपणहून सिद्धरामांच्या आश्रमात आली होती. त्या कपिला गाईवर योगेशांचे फार प्रेम होते. गोशाळेत गेल्यावर सिद्धराम प्रेमाने त्या कपिलेच्या अंगावरून हात फिरवीत असत.

(कसबा पेठेतील आजचे मल्लिकार्जुन मंदिर)

एके दिवशी पूर्वेस उजाडण्यापूर्वी, योगीराज ध्यानस्थ असतानाच कपिला आश्रमाच्या दरवाज्यासमोर उभारुन हंबरू लागली. सिद्धराम ध्यानातून जागे होऊन बाहेर येऊन पाहू लागले. तेव्हा कपिलागाय योगीराजांची प्रतिक्षा करीत असल्यासारखे वाटले. कपिलेच्या अंगावर प्रेमाने योगेश हात फिरवू लागताच ती उत्तर दिशेकडे चालू लागली. तिच्या मागे मागे सिद्धराम चालू लागले. आपल्या मागे

16372

योगेश येत असल्याचे मागे वळून पाहत पाहत पुढे चालली कपिला । या घटनेत मल्लिनाथांची इच्छा दडलेली असल्याचे सिद्धरामांनी जाणले. सिद्धराम कपिलेच्या मागे चालत जात असलेले पाहून, लोकही त्यांच्यामागून येऊ लागले. कुठल्यातरी निश्चित स्थळाचा शोध घेण्यात सिद्धरामांची दृष्टी गुंतली होती. थोडे पुढे गेल्यावर मोठे मंदार झाड दिसले. त्या झाडाखाली कपिला जाऊन थांबली तिच्या कासेतून दुधाची धार वाहू लागली. सिद्धरामेश्वर जवळ जाऊन - कपिलेला बाजूला सारून दुधाने ओली झालेली माती बाजूला करु लागले. तिथे तीन फुटी शिवलिंग असलेले दिसले, ''हाच माझा मल्लय्या । मंदार झाडाखाली प्रकट होतो म्हणून त्यांनी मला सांगितले होते'' असे सिद्धारामाच्या मुखातून आनंदभरित शब्द निघाले सिद्धराम आणि काही जणांनी मिळून ते शिवलिंग बाहेर काढले. ही दैवी घटना वाऱ्याप्रमाणे गावभर पसरली. गावातून बैलगाडी मागविण्यात आली शिवलिंग बैलगाडीत ठेवून वाजत गाजत देवालयापुढे आणले. रुद्रमुनींच्या नेतृत्वाने एका शुभमुहूर्तावर मल्लिकार्जुन लिंगाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

सिद्धरामेश्वरांच्या वचनाच्या शेवटी 'कपिलसिद्ध मल्लिकार्जुन' असे अंकित आहे. जे कार्य सिद्ध करावयाचे होते ते म्हणजे श्रीशैल मल्लिकार्जुनाचे लिंग स्थापनेचे कार्य हे कार्य कपिला गाईमुळे सिद्ध झाले म्हणून 'कपिलसिद्ध' असे म्हटले असावे. मल्लिकार्जुन हे सिद्धरामाचे आराध्य दैवत. त्यामुळे त्यांच्या वचनांच्या शेवटी 'कपिलासिद्ध मल्लिकार्जुन' असे अंकित असलेले दिसते. ते आजही मिळत असलेल्या सिद्धरामांच्या वचनांच्या शिलालेखावरुन समजते. सिद्धरामांच्या वचनांचे शिलालेख सोलापूर जिल्ह्यात ३ ठिकाणी, उस्मानाबाद जिल्ह्यात तुळजापूर जवळ २, विजापूर जिल्ह्यात १०, धारवाड जिल्ह्यात ५, शिमोगा जिल्ह्यात १ आणि चित्रदुर्ग जिल्ह्यात १ असे सहा जिल्ह्यातून एकूण २२ शिलालेख सापडलेले आहेत. आणि कांही ठिकाणी वचने ताम्रपटावरही मिळालेली आहेत. प्रत्येक शिलालेखाच्या शेवटी 'कपिला सिद्ध मल्लिकार्जून' असे नमूद आहे.

१)	सोलापूर जिल्हा	-	३
२)	उस्मानाबाद जिल्हा	-	२ तुळजापूर
३)	विजापूर जिल्हा	-	१०
४)	धारवाड जिल्हा	-	५
५)	शिवमोगा जिल्हा	-	१
६)	चित्रदुर्ग जिल्हा	-	१

सिद्धरामांनी सोन्नलगी आणि कल्याण या दोन्हीकडे राहून लोककल्याणाचे कार्य फारच व्यापक रीतीने करण्याकरता त्यानी संचार केला होता. यावरून ते अनेक ठिकाणी संचारले असतील हे स्पष्ट होते

वरील शिलालेखावरून त्यांनी सर्वत्र संचार केला असावा. तसेच काही ठिकाणी त्यांनी तपश्चर्या केली असावी. तेथे काही काळ वास केलेली चिन्हे म्हणून 'गद्दुगे' प्रसिद्ध आहेत. अजूनही तेथे त्रिकालपूजा चालते.

तुमकूर जिल्ह्यातील

१) एळूनोडू (एळतोड)

२) हावेनहाळ (हावेनळ्ळी)

३) गोडेकरी

४) कारेकुर्ची

या ठिकाणी सोलापूर सिद्धरामांची जशी त्रिकाल पूजा होते तशीच पूजा केली जाते. [४३] शुभ मुहूर्तावर रुद्रमुनींच्या नेतृत्वाखाली मल्लिकार्जुन (शिवलिंगा) ची, प्रतिष्ठापना करण्यात आली. [४४] म्हणून तर सिद्धराम शिवयोगीने श्रीशैल कपिलसिद्ध मल्लिकार्जुनलिंग सोन्नलगीमध्ये स्थापून ते एक योग रमणीय क्षेत्र बनविले, असे नुसते राघवांकच म्हणत नाही तर सर्व वीरशैव काव्य आणि पुराणामध्येही उल्लेख येतात [४५] आणि तत्पूर्वी असे म्हटले जाते की, त्यावेळी सोन्नलगीमध्ये नन्नप्पा हा राजा होता. आणि चामलादेवी ही राणी होती हे अनेक जणांच्या लेखनावरून आणि काव्यावरून समजते, त्या दोघांच्या अस्तित्वाबाबत किंवा राजवटीबद्दल अधिक माहिती उपलब्ध नसली तरी अनेक ग्रंथांवरुन ते दोघे राजा - राणी होते हे मान्य करावे लागले. कारण अनेक काव्य - ग्रंथ आणि पुराणामध्ये राणी चामलादेवीला स्वप्नदृष्टांत झाला. सिद्धरामास जमिन दान देण्यास परमेश्वराने स्वप्नात सांगितले अशी कथा सांगितली जाते त्याप्रमाणे सोन्नलगीला अभिनव श्रीशैल आणि

(किल्ल्यातील प्राचीन मल्लिकार्जुन मंदिर)

योगरमणीय क्षेत्र बनविण्यासाठी चामलादेवीने सिद्धरामांना जमिन दान दिली असा उल्लेख आढळतो (सिद्धराम चरित्र - पृ.क्र.-३९-४०) मध्ये हे स्थापित लिंग म्हणजे मल्लिकार्जुन लिंग होय. दान मिळालेल्या जमिनीवर मंदिर बांधून लिंग स्थापले हेच मल्लिकार्जुन मंदिर

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

होय. (मल्लिकार्जुनाचे लिंग आणि मंदाराचे झाड पूर्वी किल्ल्यात होते, असे म्हणतात हल्ली तेथे दोन्हीही नाहीत. आत्ताच्या किल्ल्यात श्रीशैल येथील मंदिरापेक्षाही भव्य मंदिर सिद्धरामानी बांधले होते असे संशोधनावरून कळून येते. पुढे मुसलमानांच्या राजवटीत हे मंदिर उद्ध्वस्त करून तिथे किल्ला बांधण्यात आला. मुंबई येथील संग्रहालयात द्वारपालकाच्या दोन मूर्ती आजही आपल्याला पाहावयास मिळते.[४६] आताही किल्ल्यात मल्लिकार्जुनाचे मंदिर भग्नावस्थेत पाहावयास मिळते. किल्ल्यातील हे मंदिर आता सोलापूर येथील किल्ल्याच्या आतील उत्तरेच्या बाजूस भिंतीच्या आत बुजले गेलेले एक मंदिर पुराण वस्तु विभागाच्या नजरेस इ. स. १९१७ साली आले. भिंतीस असलेल्या झरोक्यातून आतील बाजूस ओळीने खांब असल्याची गोष्ट कलेक्टर सिमकाँक्स यांच्या नजरेला १९१९ साली आली. ती गव्हर्नर जॉर्ज यांना दाखविण्यात आली. उत्खनन झाल्यानंतर तेथे चालुक्य कालीन एक हिंदू मंदिर असल्याचे दिसले. मंदिराचे गर्भग्रह पूर्वीच पाडण्यात आले होते. नंदीची मुर्ती मिळाली. पण शिवलिंग मिळाले नाही याचा अर्थ ते शिवलिंग घेऊन आताच्या मल्लिकार्जुन मंदिराची स्थापना केली गेली अशी माहिती मिळते. कदाचित मुसलमान सत्ताधीशांनी सर्व हिंदुस्थानात ठिकठिकाणी हिंदू - जैन आणि बौद्ध मंदिरे पाडून तेथे मशिदी बांधण्याचा उद्योग केला. सोलापूरच्या किल्ल्यातील उत्खननात आढळलेले मंदिराचे कांही भाग उद्ध्वस्त करून काही भाग शाबूत राखले. त्यावर बांधल्या गेलेल्या ओझ्याखाली मंदिराचा उर्वरित भाग पडून व भंगून जाऊ नये म्हणून तरतूद केली. याचे कारण मात्र समजून येत नाही.

१२ व्या शतकामध्ये वीरशैव शिवशरण सिद्धरामांनी (इ.स.११३५-११८०) तत्कालीन सोन्नलगे नाम ग्रामामध्ये आपल्या दैवताचे, श्रीशैल मल्लिकार्जुनाचे एक मंदिर उभारण्याचे आणि त्यास कपिलसिद्ध मल्लिकार्जुन नामाभिधान केल्याचे उल्लेख कवी राघवांक (इ.स. १३ वे शतक)[४७] सांगतात. सिद्धरामांनी हे देवालय निर्माण करण्याचे कार्य केले [४८] हे राघवांकाच्या चरित्रावरून समजते. श्रीशैल मल्लिकार्जुन असे नामकरण न करता 'कपिलसिद्ध मल्लिकार्जुन' या नावाने संबोधित केले. या घटनेचे सर्व वर्णन राघवांकृत 'सिद्धराम चरित्रा' मध्ये आढळते. आता हे मल्लिकार्जुन मंदिर कोणत्या तरी अज्ञात शक्तीने जमिनीखाली बुजवून टाकले ही एक थाप असावी असे वाटते. इ.स. १८८८ साली 'श्री सिद्धेश्वर पुराण कथासार' नावाने कवी राघवांक विरचित 'सिद्धराम चरित्र' आधारे एक पुस्तक आहे त्या पुस्तकात पृ. १९,२० च्या तळटीपात लेखक लिहितात की, जे या पुराणात मल्लिकार्जुनाचे देऊळ म्हणून वर्णन केलेले आहे ते मूळ किल्ल्यात आहे. तेथे लोकांची येण्याजाण्याची फार गैरसोय होऊ लागली म्हणून हल्लीचे कसब्यातील मल्लिकार्जुन मंदिर बांधण्यात आले. हल्लीच्या सभामंडपात जे खांब आहेत ते किल्ल्यातूनच आणले आहेत असे ऐकतो, ''(श्री सिद्धेश्वर पुराण कथासार, यशवंत बळवंत संत, सोलापूर; १८८८) हल्लीच्या मंदिर

निर्मितीमध्ये पूर्वीच्या जुन्या मंदिराचीच स्तंभादी सामग्री उपयोगात आणली आहे. हे मंदिर इ.स. १८१९ साली उभारण्यात आले असून तसा शिलालेख तेथील मंदिराच्या बांधकामात बसविला आहे [४९]

शिलालेख : अनेक राजे - महाराजे, प्रतिष्ठित मंडळींनी येऊन मल्लिकार्जुन मंदिरास अन्न, गाव दान दिल्याबद्दलचे कोरीव लेख लिहलेले आहेत. या लेखांवरुन अजून एक गोष्ट लक्षात येते आणि ती म्हणजे या शिलेवर 'सेट्टी' तसेच 'होलेय' असे शब्द आढळतात. 'सेट्टी' म्हणजे श्रीमंत आणि 'होलेय' म्हणजे 'महार'. यात जातीसह उल्लेख आढळतो. पण एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे, 'होलेय मल्लिशेट्टी' म्हणजे एक चांगला प्रतिष्ठित व्यापारी संघाचा प्रमुख होता. अस्पृश्य लोक सर्वसामान्यांमध्ये कसे मिळून मिसळून होते याचा एक प्रत्यय होय. समानता शिकविणाऱ्या सिद्धरामाच्या काळातील हा एक अत्यंत महत्वाचा अभिलेखीय पुरावा होय. किल्ल्यातील (जुने मंदिराचे ठिकाणी उत्खनन) केल्यानंतर त्या ठिकाणी काही वस्तू, मूर्ती, शिलालेख आदी सापडले. ते सर्व एकत्र करून संरक्षित करण्याच्या हेतूने मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या स्वाधीन करण्यात आले. कालांतराने त्या सर्व वस्तू 'प्रिन्स ऑफ वेल्स' वस्तूसंग्रहालयाच्या निर्मितीनंतर त्यांच्या सुपुर्द करण्यात आल्या. सध्या तेथे दोन प्रचंड द्वारपाल, दोन खंडित कन्नड शिलालेख आहेत. हे सर्व जुने कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिरातच सापडलेले आहेत. [५०]

कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिरास आलेल्या अनेक गाव, अन्न देणगीचा समावेश शिलालेखात होतो तसेच शिवयोगीच्या वचनांचे उल्लेख असलेला दिसून येतो. हे दान सिद्धरामेश्वरांच्या हयातीत आणि त्यांच्या पश्चातही निरंतर चालू होते असे म्हणावे लागेल. कारण सिद्धरामांच्या हयातीतच मंदिराकडे देणग्यांचा वर्षाव सुरू झाला असावा असे दिसते. कारण या लेखांमधून सिद्धरामविरचित वचने आढळतात. परंतु सिद्धरामांचे समकालीन असा एकही लेख अद्यापि उजेडात आलेला नाही. उपलब्ध असलेले सर्व लेख त्यांच्या नंतरच्या काळातील आहेत. समकालीन लेखसामग्री कालोदरात लुप्त झाली असावी असे म्हणण्यावाचून गत्यंतर नाही. असा एक अंदाज आहे की, मंदिराकडे येणाऱ्या दानांचा ओघ पाहून सिद्धरामेश्वरांनी एकदोन वैशिष्ट्यपूर्ण वचने रचून ती कोरीव लेखांतून उपयोगात आणावयास लावली.[५१] कारण असे की, आता उपलब्ध असलेल्या सिद्धरामांच्या वचनांमध्ये ह्या कोरीव लेखांतून आढळणाऱ्या वचनाचा शोध लागत नाही. वचन संकल्पनातून आढळणाऱ्या वचनांचे स्वरूप आणि शिलालेखातून आढळणाऱ्या वचनांचे स्वरूप अगदी भिन्न आहे जर त्या कोरीव लेखामध्ये हे वचन सिद्धरामांनी रचले आहेत असे निर्देश नसते तर ती निश्चितपणे त्यांचीच रचना आहे हे सांगता आले नसते हे स्पष्ट आहे. सिद्धरामांच्या ह्या वचनांचे स्वरूप शापाशीर्वादात्मक आहे. दानशासनामध्ये म्हणजे शिलालेखामध्ये अशी वचने अगर श्लोक सर्वसामान्यपणे लेखाच्या शेवटी उद्धृत करण्याचा संकेत आहे.

परंतु हे लेख सिद्धरामेश्वरांचा शापाशीर्वादात्मक वचनांचा निर्देश लेखाच्या सुरुवातीलाच करताना आढळतात.[५२]

इतिहास रचनेमध्ये प्राचीन कोरीव लेख, मंदिर आणि त्यावरील शिल्पे, चित्रकला, नाणी आदींचे अत्यंत महत्वाचे स्थान आहे. त्यानुसार सिद्धराम आणि कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिराशी निगडीत लेखसुद्धा काही प्रमाणात प्राचीन ऐतिहासिक माहिती पुरवितात. दिलेले दान यावश्चंद्रदिवाकरे चालविण्यासाठी आणि सर्वांना माहिती होण्यासाठी हे लेख कोरले गेले आहेत. संबंधित लेखांतून सिद्धरामांच्या लौकिक जीवनात व ऐतिहासिक चरित्रात महत्वाची वा मोठी भर पडतेच असे नाही. परंतु जी माहिती मिळते ती दुर्लक्षणीय नाही. ह्या लेखांपैकी एकावरून आपणास सिद्धरामांचा अंतिम काळ ठरविता येतो. जन्मकाळाचा प्रश्न जटील असला तरी निर्वाणकाळ मात्र अपवाद सोडता बरोबर नोंदविले जातात. ह्याला कारण त्यांचे लोकोत्तर जीवन, व्यक्तिमत्व आणि त्यांना मिळालेली उदंड प्रसिद्धी हे होय. ह्याच लेखांवरुन सिद्धरामाचे खरे नाव काय ते आपल्याला कळून येते. सांप्रत लोक त्यांना 'सिद्धेश्वर ' असे म्हणतात. पण त्यांचे नाव शिलालेखातून रामय्या, रामनाथ, रामनाथदेव, सिद्धनाथ, सिद्धरामनाथ, सिद्धराम, सिद्धरामेश्वर, सिद्धराम शिवयोगी अशा प्रकारे होते. सिद्धेश्वर हे नांव अपवादाने सुध्दा आढळत नाही. त्यांच्या आई - वडिलांनी त्यांचे नांव 'धुळीमहांकाळ' असे ठेवले होते हे आपण वर पाहिले आहे. हे कुलदैवत आजही दक्षिण सोलापूर तालुक्यातील 'शिंगडगाव' या गावी आहे. तेथे उत्सवही होत असतो. सिद्धराम किंवा कपिलसिद्ध मल्लिकार्जुनाशी संबंधित असलेल्या शिलालेखांची वैशिष्ट्ये किंवा बहुतांशी लेखाचा विशेष असा की, ते नंदीस्तंभावर कोरलेले आहेत. म्हणजे असे की, स्तंभाकार शिळा तासून वरील भागावर नंदीची एक बैठी मूर्ती कोरलेली असते.[५३] सिद्धरामांचा जीवितकाळ हा कल्याण चालुक्य आणि कलचुरी यांच्या काळात मोडतो. परंतु शिलालेखात ह्या राजवंशासंबंधी एकही लेख अद्यापि उजेडात आलेला नाही. सर्व लेख देवगिरीकर यादव भिल्लम पासून च्या राजवटीत मोडतात. सिद्धरामांचे नाव असलेल्या आतापर्यंत सुमारे ३४ कोरीव लेखांचा शोध लागला आहे. सिद्धरामांशी निगडीत कोरीव लेख म्हणताना त्यातील उद्धृत देणगी ही व्यक्तिश: सिद्धरामांस मिळालेली नाही तर त्यांनी निर्माण केलेल्या कपिलसिद्ध मल्लिकार्जुन मंदिरास आलेली आहे. ही लक्षात घेण्याची गोष्ट आहे.

सिद्धरामांचे समकालीन कलचुरी राजे जैन पंथानुयायी होते अगर असावेत परंतु शिलालेखांतून जी प्रशस्ती येते ती अभ्यासनीय, चिंतनीय आणि लक्षणीय आहे. त्यांचे राजकीय ध्वजाचे वर्णन 'सुवर्ण वृषभ ध्वजं ' असे येते आणि ताम्रपटास अडकविलेल्या कडीस असलेल्या राजमुद्रेवर बैठा नंदी असतो. हे कशाचे लक्षण आहे? कदाचित कलचुरी राजवंशाचे राजचिन्ह नंदी आणि सिद्धराम [५४] कपिलसिद्ध मल्लिकार्जुनाशी संबंधित स्तंभाकृती शिलालेखावरील नंदी त्याचा काय संबंध आहे ? शिलालेखातून

मंदिरास जी दाने आली ती प्रामुख्याने अंगभोग, रंगभोग, धूपदीपादी, नैवेद्य, अन्न, संतर्पण, खंडस्फुटित, जिर्णोद्धारासाठी आलेली आहेत. शिलालेखांची माहिती ही सिद्धराम आणि कपिलसिद्ध मल्लिकार्जुनाशी संबंधित आहे. ती खालीलप्रमाणे, इंगळगी शिलालेखांवरून सिद्धरामांचे नांव आणि त्यांचा जीवितकाल निश्चित करता येतो. एका लिंगाजवळ श्री सिद्धरामनाथ देवलिंग असा उल्लेख आढळतो इ.स. १२०९ च्या एका लेखावरुन त्यांचा जीवित काल ११८० पर्यंत होता असा निष्कर्ष श्री गोविंद पै यांनी काढलेला आहे. सगळ्या शिलालेखांची लिपी व भाषा कन्नड किंवा नागरी आहे क्वचित संस्कृत भाषा आढळते.

सिद्धराम शिवयोगीचे उल्लेख असलेले शिलालेख पुढील प्रमाणे सांगता येतील.

सिध्दराम शिवयोगींचे उल्लेख असलेले शिलालेख

अ.क्र.	शिलालेखांचे स्थान	जिल्हा	काल	शासन-राज्यकर्ता	लेखाची लिपी	शासन दत्तग्राम	दानी	आकार
१	चुरगी	विजापूर	११९०	यादव-भिल्लम	कन्नड	चोरहारगी	वीर बंदुरगी देवरस	SIIXX, 177
२	निलेगांव	उस्मानाबाद	११९२	यादव - भिल्लम	कन्नड	-	धारस मल्लदेव	क. भा. सं. ४ संच ३
३	संख	विजापूर	११९४	यादव - जयतुगी	कन्नड	-	यादव दंडनायक	SIIXX, 181
४	जामगांव (जावगाव)	सोलापूर	११९५	यादव - जयतुगी	कन्नड	जंबुगावे	होनोज दंडनायक लक्कीशेट्टी नारणदेव	क. भा. सं. ४ संच ३
५	शेगांव	सोलापूर	१९९७	यादव - चैत्रपाळ	-	शेगांव	धाकरस	क. भा. सं. ४ संच ३
६	कसेगांव	उस्मानाबाद	११९७	यादव - जयतुगी	कन्नड	सेयगाव	खेयीदेव-संगमदेव	क. भा. त्रे. व ४ अंक ३ १९७२
७	तोरंबा	उस्मानाबाद	११९९-१२००	भूपालतिलक-जयदेव	संस्कृत	तोरंब	मल्लिशर्मा	पंचधारा, त्रै. २६ अंक २ १९८३
८	कुडगी	विजापूर	१२०१	यादव - जयतुगी	कन्नड	-	सोमदेव, मायिदेव	SIIXX, 185,234
९	इंगळगी	गुलबर्गा	१२००-१२४७	यादव -सिंधणदेव	-	इंगळगे	लक्ष्मीदेव, प्रभुनागरस	एम.बी.कोट्टरशेट्टी १९७५ पान ५१,५२ संदर्भ शरण साहित्य त्रैमासिक खं. ११ अंक १(१९८०) पान ६३,६४
१०	इटकल	उस्मानाबाद	१२१८	यादव - सिंधणदेव	कन्नड	इटीगेहळ्ळी	मगरमुरारी संगमदेव	
११	मंत्रवाडी	धारवाड	१२३४-१२३५	यादव - सिंधणदेव	कन्नड	मंत्रवीडू	होंनबोम्मी शेट्टी	कं. भा.त्रे. व ३ अं. ४
१२	गुंजेवाडी	सोलापूर	१२३३	यादव - सिंधणदेव	-	गुंजयगांव	-	हा लेख अप्रकाशित आहे.
१३	कप्पनिंबर्गी	विजापूर	१२४३	यादव - सिंधणदेव	कन्नड	-	केशव देवनायक	SIIXX, 201
१४	गुंडकरजगी (गुंडगर्जगी)	विजापूर	१२००-१२४७	यादव - सिंधणदेव	कन्नड	-	-	SIIXV, 184 PP 226
१५	अक्कलकोट	सोलापूर	१२५५	यादव - कन्नरदेव	कन्नड	-	-	K.I. Vol.II PP 137

१६	टाकळी	विजापूर	१२४५-१२६१	यादव - कण्णदेव	संस्कृत	-	-	SIIXX, 218 PP 267
१७	फडकेनूर	विजापूर	१२५६	यादव - कन्नरदेव	कन्नड	पडेयकनूर	बसरीयकोड महाप्रभूनूरस	SIIXV, 190 PP 233
१८	जत्तरगी	विजापूर	१२५७	यादव - कन्नरदेव	कन्नड	दट्टूगी	सामंत मुद्दिगदेव	SIIXV, 191 PP 235
१९	तडवळ	सोलापूर	१२५७	यादव - कन्नरदेव	कन्नड	-	चेटरस, कुचरस, सोयीदेव	K.I. Vol.II PP 141
२०	कोळीसाले	शिवमोग्गा	१२५६	यादव - कन्नरदेव	कन्नड	कोळीसाले	बिररस चट्टीयदेव	E.C. Vol. VIII शिमोगा सोरब 561
२१	बुडरसिंगी	धारवाड	१२५७	कदंब - चट्टयदेव	कन्नड	बुच्चींगी	चट्टीय	K.U.J. VI P. 128,162
२२	कुटबागी (क्रटबागी)	धारवाड	१२६४	यादव - महादेवराय	कन्नड	-	कदंब-चट्टीयदेव	SIIXV, 195 PP 241
२३	संगुर (संगुरु)	धारवाड	१२६५	यादव - महादेवराय	कन्नड	चुंगुरु	देवराज	E.I. Vol VIII PP 189
२४	मरडीपूर	मंडय	१२८०	-	कन्नड	-	-	EP. Car Vol III Mandya No. 33
२५	थडहळ्ळी	विजापूर	१३००	यादव -	कन्नड	-	-	SIIXV, 206 PP 250
२६	कटनूर	धारवाड	१२७१-१३१२	यादव - रामचंद्रदेव	कन्नड	-	-	K.U.J. VII PP 135,1962
२७	चडचण	विजापूर	१३००	-	कन्नड	-	-	SIIXX, 342 PP 558
२८	चित्रदुर्ग	चित्रदुर्ग	१३५६	विजयनगर, बुक्कराय	कन्नड	सुवडीपूर	-	EP. Car XI चित्रदुर्ग 3
२९	कामती खुर्द	सोलापूर	१३१७	यादव - सिंधणदेव	संस्कृत, देवनागरी	धाकुटी कंमंनी	बलराघवदेव	नवभारत मासिक वाई,१९७७ पृ.क्र.५७-६६
३०	आचेगांव	सोलापूर	-	यादव -	कन्नड	-	-	अप्रकाशित
३१	कुडल	सोलापूर	१२००	-	भाषा-मराठी लिपी-देवनागरी	-	-	भा. इ. प. संस्कृतीत त्रै. मुंबई व १७ पृ. ६७,१९८०
३२	हणमगांव	सोलापूर	-	यादव - जयतुगीदेव	कन्नड	कुंभारी गांव (भूमी)	-	अद्यापी अप्रकाशित
३३	सोलापूर	सोलापूर	-	-	भाषा-मराठी लिपी-देवनागरी	-	रायबरी दामोदर	संशोधन तरंग आनंद कुंभार, १९८८ यात

३४	सोलापूर A, B	सोलापूर	-	-	कन्नड	-	-	A.R.I.E.for1963-64, No.B 317-18 हा लेख संशोधन तरंग १९८८ मध्ये
३५	कुरुडगी	विजापूर	१२०१	यादव - जयतुगी	कन्नड	भूमीदान	सोमदेव, मायिदेव	SIIXX, No.185 प्रकाशित

शिलालेखांचा आकारा विषयीचा संदर्भ

1.	**S.I.I**	South Indian Inscriptions.
2.	**क. भा.**	कर्नाटक भारती (कन्नड त्रैमासिक, कर्नाटक विद्यालय धारवाड)
3.	**क. भा.इ. आणि सं.**	भारतीय इतिहास आणि संस्कृति (त्रैमा.) मुंबई.
4.	**K.I.**	Karnatak Inscriptions
5.	**E. C.**	Epigraphica Carnatica
6.	**J.K.U.**	Journal of the Karnataka University (Humanities)
7.	**E.I.**	Epigraphia Indica
8.	**A. R. I. E.**	Annual Report on Indian Epigraphy

सिद्धरामाचा विवाह : सिद्धरामांचे चरित्र लिहिताना सर्वात महत्वाचे म्हणजे त्यांचे लग्न झाले की नाही ही बाब. त्यांची ती सत्वपरीक्षाच होती असे म्हणावे लागेल.

सिद्धराम शिवयोगी आजन्म संन्यासीच राहिले असे. त्यांचे जीवनचरित्र सांगणाऱ्या अनेक ग्रंथावरून लक्षात येते. त्यांचे लग्न झाल्याविषयीचे उल्लेख कोठेही नाही. कामना आणि वासनारहित जन्मलेले सिद्धराम अपूर्व वैरागी होते. असा उल्लेख कवी राघवांकानी त्यांच्या जीवनचरित्रामध्ये केलेला आहे. सिद्धरामांच्या योगसाधनेला, त्यांच्या निर्भयतेला प्रतिष्ठित म्हणून सांगितले जाते. त्या विषयी राघवांकाने सिद्धराम चरित्रामध्ये एक कथा कल्पित केली आहे.[५५] अपूर्व सौंदर्य असलेल्या एक सुंदर कन्येची निमिर्ती करुन कामदेव सिद्धराम शिवयोगीला हरविण्यामध्ये विफल होतो.[५६] 'सतिशी सती' कसे लग्न होऊ शकेल ही एवढीच गोष्ट. या गोष्टीला वीरशैव दर्शन आणि आचार दृष्टीने अत्यंत महत्व प्राप्त झाले आहे. तलावाचे काम चालू असताना अनेक घटना घडल्या. या दरम्यानचे हे जनमत होय. ही योगी सिद्धरामेश्वरांची सत्वपरीक्षाच ठरली.

एकदा रोजच्या प्रमाणे योगीराज सायंकाळी आपली गावप्रदक्षिणा संपवून येऊन मठाच्या पुढील कट्ट्यावर आसनस्थ झाले होते. त्या दिवशी त्यांच्या जवळ कुणीही नव्हते तिन्हीसांजेची वेळ होती. प्रशांत वातावरण, गगनात अष्टमीचे चांदणे पसरले होते. पुष्प वाटिकेतून येणाऱ्या मंद वाऱ्यामुळे परिसर सुगंधित झाला होता. काही क्षणातच ते स्वत:ला विसरले. कुठलीही संवेदना नाही अशा शून्यावस्थेत ते लीन झाले होते. अशा स्थितीत किती वेळ गेला हे कळले नाही. कुणीतरी आपल्या तळपायाला स्पर्श करीत आहे, हे जाणवल्याने त्यांनी डोळे उघडून पाहिले. जवळच एक सुंदर तरुणी बसलेली दिसली. चटकन आसनातून ते उठून उभे राहिले, ''कोण तू ? इकडे का आलीस ?'' असे रागाने विचारले असता ती लाजत मुरडत उत्तरली, ''स्वामी, मी मदनिका. कुंभार कन्या आपले सामर्थ्य, दैवी रूप, गुण पाहून माझे सर्वस्व आपल्या चरणी अर्पण करण्यास मी आले आहे. मी आपल्यावर अनुरक्त झाले आहे.'' थोडा वेळ थांबून ती पुढे म्हणाली ''माझा स्वीकार व्हावा देवा, फार दिवसापासून आपल्याला एकांतात भेटण्याची इच्छा होती. तो शुभयोग आज जुळून आला आहे.'' सिद्धरामांनी तिच्याकडे पाहिले, ''खरंच ही स्वरूप सुंदरी आहे, शिवाची अर्धांगिनी शिवानी ।'' असा भाव त्यांच्यामनी उमटला. पुन्हा ती म्हणाली,''देवा, हे पवित्र जीवपुष्प आपल्या चरणी अर्पण करण्यास आले आहे. आपल्याशी लग्न करण्याची तीव्र इच्छा, अपेक्षा धरुन आले आहे. नकार देऊ नये प्रभु'' नम्र होऊन, दीनतेने अशी प्रार्थना ती करु लागली. स्मित हास्य करीत योगीराज उद्‌गारले,'' लग्न ? माझे लग्न केव्हाच झाले आहे ! श्रीशैल मल्लिकार्जुनच आम्हा सर्वांचा पती. आपण सर्व त्याच्याच सती आहोत, 'सतीला सती ' असणे शक्य आहे का आई?'' तेव्हा कुंभारकन्येने त्यांच्याशी तिचे लग्न न झाल्यास होमकुंडात उडी घेऊन प्राण

देते असे सांगितल्यानंतर योगीराज सिद्धराम म्हणाले, 'होमकुंडात जाळायचे तो देह नव्हे, तर देहात लपलेली वासना, कामना. मनातील काम क्रोधादी विकार जाळल्यास तूच महादेवी होशील असे म्हणत योगीराजांनी आपली दिव्य योगिक दृष्टी तिच्या डोळ्यात रोवली. अचानक अनामिक भाव तिच्या सर्वांगात व्यापला. तनमन कंपित झाले, तिच्या भावना संपूर्णपणे बदलून गेल्या. नंतर तिने सिद्धरामांची क्षमा मागितली.

दुसऱ्या दिवशी होम मैदानावर हजारोंनी लोक जमले होते. योगी सिद्धराम आपली सकाळची पूजा, ध्यान संपवून होमकट्ट्याजवळ आले. सिद्धराम तिथे येण्यापूर्वीच ती सौंदर्यशालिनी तरुणी शुभ्र वस्त्रे नेसून पाठीवर लांब सडक केस सोडून होमकट्ट्याजवळ उभी होती. होम प्रज्वलित केल्यानंतर योगी सिद्राम म्हणतात. 'देह हे देवाचे मंदिर. ते जाळून काय उपयोग?' तिच्या मनी दडलेली सर्व वासना उपटून आपल्या हाती असलेल्या हवन-द्रव्याबरोबर होमकुंडात घालण्याची भावना तीव्र झाली. तिच्यातील वासना जळून खाक होत असल्याच अनुभव आला. तिच्यात आता संपूर्ण सात्विक भाव व्यापला होता. तिने योगीनाथांच्या चरणी वाकून नमस्कार केला तेव्हा सिद्धराम म्हणतात,''आता तू सामान्य स्त्री नव्हे। कपिलसिद्ध मल्लिकार्जुन देवाचे रुप तू।'' हे एका वचनातून सांगितले आहे.

'हेण्णू हेण्णल्ल । हेण्णु रक्कसीयल्ल ।
हेण्णु साक्षात कपिलसिद्ध मल्लिकार्जुन ॥
स्त्री ही नसे नारी । नारी ही नसे राक्षसीण।
नारी असे प्रत्यक्ष कपिलसिद्ध मल्लिकार्जुन देव ॥ [५७]

अशा प्रकारे योगीराजांच्या मार्गदर्शनाने मदनिका साधनामार्गावर चालू लागली. पुढे तिच्या जीवनात संपूर्णपणे परिवर्तन घडले, ती मदनिका मादांबा बनली होती. पण याबद्दल दुसरी एक कथा अशी सांगितली जाते की, एकदा सिद्धराम योगसाधनेत निमग्न होते. ते जेव्हा साधनास्थळाच्या बाहेर येत तेव्हा त्यांना अंगणात शेणसडा घालून सुरेख रांगोळी काढलेली दिसत असे. हे काम कोण करते हे त्यांना कळेना. एके दिवशी ते नेहमीच्या वेळे आधी साधना गृहातून बाहेर आले. तेव्हा एक सुंदर तरुणी सडा घालून रांगोळी रेखत असलेली त्यांना दिसली. सिद्धरामांनी त्या तरुणीला प्रश्न केला, 'तू कोण आहेस ? आणि हे काम का करीत आहेस? ' 'मी कुंभारकन्या आहे आपली सेवा घडावी म्हणून मी रोज अंगणात सडा घालून रांगोळी काढते.' त्या सुंदर तरुणीने उत्तर दिले. सिद्धरामांनी अधिक चौकशी केल्यावर त्यांना कळले की त्या कुंभार कन्यकेची त्यांच्याशी लग्न करण्याची इच्छा आहे. तिने आपली इच्छा व्यक्त केल्यावर सिद्धराम म्हणाले, 'मी लिंगागी आहे, मल्लिकार्जुन माझे पती असून मी त्यांची सती आहे, अशा सति-पति भावाने मी साधना करीत आहे. मग एका स्त्रीचा दुसऱ्या स्त्रीशी विवाह कसा होऊ शकेल?'

असे सांगून सिद्धरामांनी तिच्याशी विवाह करण्यास नकार दिला. तेव्हा तिने अत्यंत व्याकूळतेने त्यांना विनवणी केली. तेव्हा त्यांनी आपल्या योगदंडाशी लग्न लावण्यास सांगितले त्यांनी हे प्रतिकात्मक लग्न ठरविले. त्याप्रमाणे त्या कुंभारकन्यकेचे योगदंडाशी लग्न लावले आणि आपल्याला आध्यात्मिक मुक्ती मिळाली असे मानून होमकुंडात उडी घेऊन ती सती गेली, या प्रतिकात्मक विवाहसोहळ्यात स्वत: सिद्धरामेश्वर सहभागी झाले होते.[५८]

सिद्धरामेश्वरांचे ब्रह्मचर्य :

सदाचरणावर विश्वास ठेवणारा, गरीबांना मदत करणारा, दीन-दलित, भुकेले व तहानलेल्यांना अन्न-पाणी देणाऱ्या सिद्धरामांच्या विरुद्धही काही लोक होतेच. सिद्धराम शिवयोगी आजन्म संन्यासी म्हणूनच आपले जीवन जगले. त्यांच्या कोणत्याही जीवन-चरित्रामध्ये त्यांचे लग्न झाल्याचा उल्लेख कोठेही मिळत नाही. आजन्म वैरागी जीवन ते जगले हे कवी राघवांक सांगतात.

सिद्धरामांनी कामना या भावनेला कधीच आपल्याजवळ येऊ दिलेले नाही, हे त्यांच्या वचनांमधून, त्रिविधीमधून समजून येते. त्यांचे भावना निर्मळ होती कलंकित नव्हती. यासंबंधात राघवांकानी एक कथा सिद्धराम चरित्रामध्ये सांगितले आहे. एक सुंदर कन्या निर्माण करुन तिला पाठवून कामदेव सिद्धरामांना योग्याच्या मार्गावरून दूर करण्याचा प्रयत्न करतात. पण सिद्धराम आपला तोल ढळू न देता उलट कामदेवाला हरवितात असा उल्लेख 'सिद्धराम चरित्र' संपुट - ४ पान नं. ६५ - ७२ वर आहे.

वरील प्रसंगामध्ये सांगितलेल्या गोष्टी वीरशैव दर्शन आणि आचार यांच्य दृष्टीने अत्यंत महत्वाच्या बनल्या आहेत. वीरशैवांमध्ये 'सती-पती' ही भावना एवढीच नसून 'शरणसती लिंगपती' ही भावना दृढ [५९] आहे. एका ना अनेक रीतीने कामप्रलोभनेमध्ये लोक अडकले जातात पण कामनेच्या मृत्यूमुळे त्यांच्या जीवनामध्ये अमूलाग्र असे परिवर्तन होऊन ते आत्ममार्गातील महावैराग्याची जगू मूर्तीच बनतात अशी हरिहरांनी कल्पना केलेली आहे. पण या विषयामध्ये चामरस आणि 'शून्य संपादनेचे' लेखक यांची कल्पना वेगळीच आहे. अल्लमप्रभू हे जन्मत:च वैराग्यमूर्ती म्हणून चामरसाने प्रतिपादित केले आहे. अल्लमप्रभूंचे वचन चामरस आणि शून्य संपादने लेखकांचे म्हणणे एकसारखे असेल असे वाटते. पण सिद्धरामांचे वचन, ज्यामध्ये अल्लमप्रभू मायाने मोहित झाले असतील असा उल्लेख कोठेच दिसत नाही.

म्हणजे अल्लमप्रभू हेही महावैरागी होते यात शंकाच वाटत नाही. सिद्धराम शिवयोगी हे मोठे 'योगी' होते. आजन्म ब्रह्मचारी राहून त्यांनी धार्मिक व सामाजिक कामे पार पाडली याबाबतचे पुरावे मिळतात. ते ब्रह्मचारी होते अजून एका घटनेवरुन लक्षात येत ते म्हणजे कल्याणमध्ये सनानतेवर

उभारलेले अनुभव मंटप. या मंटपाची रचना व कल्पना बसवण्णांनी केली असली तरी ते ब्रह्मचारी नव्हते. त्यामुळे शून्य सिंहासनाचे उत्तराधिकारी प्रथम 'अल्लमप्रभू' आणि दुसरे 'चेन्नबसवण्णा' व तिसरे उत्तराधिकारी म्हणजे 'सिद्धरामेश्वर '. शून्य सिंहासन चढणारे हे केवळ असामान्य नव्हे तर अल्लमप्रभू व चेन्नबसवण्णा हे संन्यासी. शून्य सिंहासनावर परंपरेनुसार आरुढ होणारे नंतरचे गुरु तिसरे उत्तराधिकारी ''सिद्धरामेश्वर'' होय. अनुभव मंटपावरून असे लक्षात येते की, शून्य सिंहासनावर आरूढ होणारे योगी हे संन्यासी व ब्रह्मचारी होते. म्हणजे सिद्धरामेश्वर हे शून्य सिंहासनाचे तिसरे उत्तराधिकारी असल्याने ते ब्रह्मचारी होते यात काही शंका वाटत नाही.[६०]

सिद्धरामेश्वर आपल्या कार्यास सिद्ध असतानाच अनेक आश्चर्यकारक घटना घडल्या, त्यामध्ये काही कथांचा समावेश आहे. त्या कथांचा राघवांकरचित 'सिद्धरामचरित्र' यामध्ये उल्लेख आहे.

१) **लक्ष्मीचे आगमन :** रोजच्या प्रमाणे एकदा सिद्धराम क्षेत्र प्रदक्षिणा करण्यास निघाले असताना लक्ष्मी समोर येऊन उभी राहिती, सिद्धरामाने तिची चौकशी केली असता ती लक्ष्मी असल्याचे समजले. ती चंचल असल्यामुळे एका ठिकाणी ती राहू शकत नाही म्हणून सिद्धरामेश्वरांनी तिला सोन्नलगीत राहण्यास परवानगी दिली नाही. तिच्या आग्रहाखातर आणि तिच्या कडून वचन घेऊन तिच्या इच्छे प्रमाणे पांगळी होऊन इथेच सेवा करेन या वचना नुसार सिद्धरामांनी तिला परवानगी दिली. (सोलापूरात आजही टिळक चौक जवळील भांडेगल्लीत सुमारे अडीच फूट उंच असलेली लक्ष्मीची मूर्ती असून तिला पाय नाहीत. आठशे वर्षापूर्वी बांधलेले ते छोटेसे मंदिर होते, अलीकडे जिर्णोद्धार करण्यात आला आहे. तिला पांगळी लक्ष्मी असे म्हणतात.)[६१]

२) **गंधर्वमुक्त :** तलावाच्या काठी, बाभळीच्या झाडाखाली सिद्धरामेश्वर योगध्यान करीत बसले होते. त्यावेळेस त्यांना एका हरिणाने स्पर्श केला हरणाचा स्पर्श होताच सिद्धरामेश्वर योगध्यानातून सावध झाले तो पर्यंत एक चमत्कार घडत होता. त्या हरीणाने आपले रूप टाकून गंधर्वरूप धारण केले. तेव्हा सिद्धरामेश्वरांनी त्यांची चौकशी केली, त्यावेळेस तो सांगू लागला, ''महाराज, विद्याधर देशामध्ये जळजातखेट शहराचा पुण्यधन राजा व कुसुमगंधी राणीचा मी पुत्र मेघचूड आहे'' सिद्धरामांनी शाप कुणी दिला व का दिला असे विचारले असता, गंधर्व म्हणाला, ''महाराज, मी हंपी येथे हेमकुट पर्वतावर परमेश्वर सभेत बसलो असतानी मी दर्शनास गेलो, सभा विसर्जन होते वेळेस माझे पाय कैवल्य ऋषीस चुकून लागताच मुनी अतिशय संतप्त झाले आणि तू 'पशूरुप धारण' कर असा शाप दिला'' आज मात्र मी आपल्या कृपेने शापातून मुक्त

झालो आहे. [६२] अशा प्रकारे शापित हरणाचे सिद्धरामांनी मुक्तता केली.[६३] गंधर्वाने सिद्धरामाना शूर असे संबोधून एक शस्त्र दिले. ते शस्त्र सिद्धराम रोज सोबत घेऊन फिरत असत.

३) **उद्धारक सिद्धराम :** सिद्धरामांनी ते शस्त्र हाती घेतले आणि त्यांचा संचार सुरू झाला त्या शस्त्रास ते क्षणभरही विसंबत नसत लोकांना आश्चर्य वाटे. पण सिद्धरामांच्या सर्वच लीला अनाकालनीय होते. मल्लिकार्जुनाचे पूजन हेच त्यांचे जीवनव्रत. एके दिवशी सिद्धराम आपल्या पुष्पवाटिकेत फुले वेचीत होते. ध्यानी शंकरच स्थिर होते. एवढ्यात एक शापित योगीराज सिद्धरामांच्या पुढ्यात स्थिरावला, तो सारखा म्हणू लागला 'जाऊ का राहू' । त्याचा हा घोषच थांबेना सिद्धरामांना पूजेसाठी जायचे होते. ते तात्काळ 'जा' असे म्हणाले, लगेच सिद्धयोग्याने देहत्याग केला. एक तेज:पुंज वलयाचा पुंजका आकाश मार्गस्थ झाला. सिद्धरामांना आश्चर्य वाटले. या योग्याचा आपण वध केला की काय अशी शंका त्यांना वाटू लागली. तेव्हा उमापतीने सिद्धरामांची समजूत घालून मूळ कथा सांगितली ती अशी, हा उद्धरुन गेलेला महर्षी पूर्वजन्मी महायोगी होता 'अतीहंस' त्याचे नाव. एके दिवशी अचानक त्यास कामबलाने घेरले त्याच्या हातून व्यभिचार घडला. तशाच अमंगल अवस्थेत तो आपल्या सद्गुरुकडे गेला. सद्गुरु 'मैलाकमुनि' अंतर्ज्ञानी होते. त्या योग्याचे पापकर्म जाणून त्यास शाप दिला, ''अरे तू पाच वेळा मूढ होऊन जन्मशील. पण आज तो तुझ्या चरण स्पर्शाने उद्धरला. अतिहंस तुझ्या चरण स्पर्शाने उद्धारला.

नंतर सिद्धरामांनी भगवंताच्या आज्ञेवरुन त्या पार्थीवास तटाकासमीप समाधी दिली.[६४]

४) मयूरक उध्दारला : एकदा सिद्धरामांच्या समोर एक हरिण आले. हृदयात बाण विंधला होता. त्यातून रक्तस्त्राव चालू होता. भयाने ते हरिण थराथरा कापत होते. ते हरिण मलीन वदनाने सिद्धरामांच्या समोर आले. सिद्धराम करूणानिधी होते. त्यांचे चित्त कळवळले. त्यांनी त्या मृगास हाती धरले. त्याच्या शिंगास हात लावताच ते हरिण दिव्य शरीरी झाले. त्याने चरणांवर उडी घेतली. त्यामयूराचे शाप का व कशासाठी होते असे विचारले असता मयुरक म्हणाला,''लोहितकेतु हा गंधर्वाचा अधिपती, मी त्यांचा पुत्र आहे. माझे नाव मयूरक ! मी एकदा शतभृंगी गडावर पारधेसाठी गेलो होतो. त्या ठिकाणी मी एका मृगाची पारध केली. ते हरिण महर्षी विश्वदर्शनांच्या पुढे जाऊन पडले. दयाळू ऋषींचे कारुण्य आणि अपराध्यासाठी क्रौर्य जागे झाले. ते तात्काळ म्हणाले; 'तूही असाच मृग होशील आणि तुलाही असेच मरावे लागेल. मारावे

तसे मरावे हा नियतीचा नियम आहे.' मी ऋषींचे चरण धरले. उ:शाप मागितला. आणि योगीराया, सिद्धदेवा, तो योग आज आला. मी मुक्त झालो. सिध्दरामांनी मयूरकांस अभय देऊन देवलोकी धाडले.[६५]

४) **शापविमोचन** : सोलापूरात एकदा एक गंधर्व संचार करीत होते. त्यांच्या हृदयस्थानी मत्स्याकृती जखम होती. त्यातून भयानक घाण स्त्राव येत असे त्यामुळे आसमंतात सगळीकडे दुर्गंधी पसरत असे. लोक त्याला जवळ येऊ देत नसत. त्याने सिद्धरामेश्वर तलावात स्नान केले आणि मल्लिनाथांच्या दर्शनास आला. दर्शन पूर्ण होताच त्याच्या जखमेतून घाण स्त्राव येण्याचे बंद झाले. वातावरणात सुगंध दरवळला. त्याने सिद्धरामांच्या चरणी वंदन करून आपला परिचय दिला. 'मी सुगंधावती नगरच्या राजाचा सुपुत्र. माझे नाव कुमुद - शेखर. माझे वडिल धर्मज्ञ आणि माझी आई महापतिव्रता आहे. माझ्या पित्याचे सन्मित्र कुबेर यांनी मला जलक्रीडा करण्यासाठी अलकावतीस बोलावले. ते रम्य - मनोहर स्थळ पाहून मी हर्षित झालो. सरोवरात मी माझ्या भार्येसह जलक्रीडा करीत होतो. त्या तलावात एक मासा होता. त्या माशास भिऊन माझी पत्नी बावरली मी त्या माशांचा वध केला तेव्हा तो मासा महामुनी कपिलांच्या हृदयांवर आदळला. ज्यांनी सागराचा संहार केला त्याने शाप दिला. ''तुझ्या हृदयास सतत दुर्गंधी येईल. मग गंधर्वाच्या विनवणीवरुन त्यांनी त्यास उ:शाप दिला. सिद्धरामांच्या चरणस्पर्शाने कृतार्थ आणि मुक्त होशील. असा उ:शाप दिला.[६६] सिद्धरामांनी त्याला मुक्त केले.

५) **यज्ञ भूतांचे पालन** – सिद्धरामांचा नित्यनेम रोज चालूच होता. भूतांच्या हितासाठी यज्ञादी होमही प्रत्यही होत असत. एके दिवशी आकाशात विपुल मेघ जमा झाले. विजांचा कडकडाट होऊ लागला. मोर - लांडोर नाचू लागले, हंसादी पक्ष्यांची क्रीडा सुरू झाली. पृथ्वीवर रात्रीच्या समयाप्रमाणे अंधकार दाटला. अशाही परिस्थीत सिद्धरामांची प्रदक्षिणा चालूच होती. एवढ्यात वीज चमकली. तिच्या सहस्त्र नयनानी महापुरुष सिद्धरामांचे दर्शन घेतले. ती विद्युल्लता विचारमग्न झाली. संतदर्शनाने पापाची निवृत्ती होते, हा सर्वमान्य संकेत आहे आणि विद्युल्लता सिद्धरामेश्वरांच्या चरणापाशी आली. तेवढ्यात सिद्धरामांनी विचार केला की मुळात ती हिंसक आहे. यापुढेही तिचे हे क्रौर्य संपुष्टात येणार नाही म्हणून तिला सिद्धरामांनी तीव्र शस्त्राने टोचले. विद्युल्लता अडकली, तिने अधिनाथांची स्तुती आरंभली, हे कानी येताच भगवान शंकरांनी सिद्धरामांना विचारले,

'अगा तू भुतस्नेही म्हणविशी ।

आणि हे काय गा विपरित करीशी । '

विद्युल्लतेमुळे होणारा नाश करणे मला जड आहे पण ते अमृताचे सहोदर आहे आणि शरणागतांना आश्रय देणे हा संत देवांचा धर्म असतो. अशा प्रकारे विद्युल्लतेला सोडवून आणि या शस्त्रामुळे हा त्रास झाला म्हणून सिद्धरामेश्वरांनी ते शस्त्र शस्त्रागृहात ठेवून टाकले.[६७]

एक कथा अशीही सांगितली जाते की, एकदा सिद्धराम, कलय्या, बोमय्या तलावाच्या काठावर पाहणी करत निघाले खूप दिवस पाऊस न झाल्याने लोक पावसाची वाट पाहत होते. त्या दिवशी एकाएकी जोराचा वारा वाहू लागला. अचानक आकाशात काळे ढग जमा झाले. तळपत असलेल्या सूर्याचे किरण मंद झाले. आता वीज कोठे तरी पडणार या विचाराने सिद्धराम ढगाकडे पाहू लागले. एक-दोन ठिकाणी वीज पडली. इतक्यात, 'सिद्धराम, गुरुदेवा' अशी आर्त हाक त्यांच्या अंतर्मनाला ऐकू आली. तत्क्षणी सिद्धयोगींनी आपला उजवा हात उंचावला. त्यावेळी कल्लय्याची दृष्टी सिद्धरामाकडे आणि सिद्धरामांचे लक्ष आकाशाकडे गेले. त्यावेळी देवालयापासून काही अंतरावर विजेची ज्वाला एकाच ठिकाणी गरगर फिरत असलेली दिसली. गावातील लोक देवालयावर वीज कोसळली असे वाटून धावत आले. जमलेले लोक, कल्लय्या बोमय्या चकित होऊन आकाशात फिरणाऱ्या विजेच्या गोलाकाकडे पाहत राहिले. पण योगीराजांचे कुणाकडेही लक्ष नव्हते, इतक्यात दासोहासाठी लाकडे आणण्यासाठी गेलेला वीरप्पा आपल्या जीवाची पर्वा न करता धावत येऊन पडला. पण तेव्हा सिद्धरामेश्वराच्या कृपेने त्याचे जीव [६८] वाचले. आणि वीज लांब जाऊन पडली. पंचमहाभूते श्रेष्ठ योगीपुरुषांच्या स्वाधीन असतात हे यावरुन कळून येते. भक्त कोणत्याही संकटात सापडताच भक्तांच्या रक्षणार्थ योगीराजांची कृपा धावून येत होती. अशा अनेक अलौकिक घटना, चमत्कार सिद्धरामांकडून घडत होते. त्यांच्या अतिमानसिक शक्तीने कार्यसिद्धी होत असे. वरील कथाचा अनेक पुस्तकांतून उल्लेखिल्या आहेत. वरील कथा चमत्कारिक वाटत असल्या तरी त्यांचा उल्लेख अनेक पुस्तकात व राघवांकरचित काव्यात आहे. या कथा खालील पुस्तकातही आढळतात.

१) डी. एल. नरसिंहाचार्य - सिद्धराम चतित्रेसंग्रह

२) दा. का. थावरे - शिवयोगी सिद्धरामेश्वर

३) शशिकला मडकी - शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत

इत्यादी अनेक पुस्तकांतून या कथा स्पष्ट करता येतात. तशाच त्या लोकांतही प्रसिद्ध आहेत.

तळटिपा

१.	मडकी शशिकला राजशेखर	शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, राजशेखर चं. मडकी, बसव सेंटर, राजकला मार्ग, सोलापूर ; २००१ (पृ. क्र. ७)
२.	कित्ता,	(पृ.क्र. ९)
३.	कित्ता,	(पृ.क्र. ८)
४.	कोट्टरशेट्टी एम. बी.	सिद्धराम शिवयोगी, कन्नड अध्ययन पीठ, कर्नाटक विश्वविद्यालय, धारवाड; १९७५ (पृ.क्र. ७६)
५.	कित्ता,	(पृ.क्र. ७६)
६.	कित्ता, मडकी शशिकला	शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत (पृ.क्र. १२,१३)
७.	कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी.	सिद्धराम शिवयोगी (पृ.क्र. ७६)
८.	थावरे दा. का.	शिवयोगी सिद्धरामेश्वर, प्रसाद प्रकाशन सदाशिव पेठ, पुणे; १९९१ (पृ.क्र. २५)
९.	कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी.	सिद्धराम शिवयोगी (पृ.क्र. ७६)
१०.	मडकी शशिकला	सिद्धरामेश्वर वचनांजली, बसव महामने चॅरिटेबल ट्रस्ट बसव मडप, दूसरा ब्लॉक, रावजी नगर, बंगळुरू; १९९३ (पृ.क्र. २)
११.	कित्ता, कोट्टरशेट्टी	सिद्धराम शिवयोगी (पृ.क्र. ७६)
१२.	स्वामी ईश्वरय्या विरय्या	सोलापूर श्री महाशिवयोगी सिद्धरामेश्वर सचित्र चरित्र, चनबसय्या ईश्वरय्या स्वामी, विभूती मठ, सिद्धेश्वर महाद्वार, सोलापूर; १९९३ (पृ.क्र. ७)
१३.	कित्ता, मडकी	सिद्धरामेश्वर वचनांजली (पृ.क्र. २)
१४.	कित्ता, कोट्टरशेट्टी	सिद्धराम शिवयोगी (पृ.क्र. ७६)
१५.	कित्ता, मडकी	शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत (पृ.क्र. २०)
१६.	कित्ता, कोट्टरशेट्टी	सिद्धराम शिवयोगी (पृ.क्र. ७६,७७)
१७.	कित्ता,	(पृ.क्र. ७७)
१८.	लिगाडे जयदेवीताई	श्री सिद्धरामाची त्रिविधी, कन्नड कोटी प्रकाशन,

		सोलापूर;१९५८ (पृ.क्र. ८) प्रस्तावना
१९.	कित्ता, कोट्टरशेट्टी	सिद्धराम शिवयोगी (पृ.क्र. ७७)
२०.	कित्ता,	(पृ.क्र. ७७)
२१.	कित्ता, मडकी शशिकला	शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत (पृ.क्र. २४)
२२.	कित्ता,	(पृ.क्र. २६)
२३.	कित्ता, लिगाडे जयदेवीताई	श्री सिद्धरामाची त्रिविधी (पृ.क्र. २) प्रस्तावना
२४.	कित्ता, मडकी शशिकला	शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत (पृ.क्र. २७)
२५.	कित्ता, मडकी शशिकला	सिद्धरामेश्वर वचनांजली (पृ.क्र. ४) प्रस्तावना
२६.	कित्ता, मडकी शशिकला	शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत (पृ.क्र. २७)
२७.	कित्ता, कोट्टरशेट्टी एम.बी.	सिद्धराम शिवयोगी (पृ.क्र. ७७)
२८.	श्री सिद्धरामेश्वर देवस्थान पंचकमिटी	श्री सिद्धरामेश्वर माहात्म्य (राघवांकरचित सिद्धरामचरित्र) सिद्धेश्वर मंदिर, सोलापूर; प्रथम आवृत्ती १८८८, द्वितीय आवृती २००४ (पृ.क्र. १७)
२९.	कित्ता, कोट्टरशेट्टी	सिद्धराम शिवयोगी, (पृ.क्र. ७७)
३०.	कित्ता, (विभूतीमट स्वामी)	सोलापूर श्री महाशिवयोगी सिद्धरामेश्वर सचित्र चरित्र (पृ.क्र. १८)
३१.	कित्ता, मडकी	शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत (पृ.क्र. ३३)
३२.	कित्ता,	(पृ.क्र. ३३)
३३.	कित्ता,	(पृ.क्र. ३४)
३४.	कित्ता, लिगाडे	सिद्धरामाची त्रिविधी (चन्नप्पा उत्तुंगीकृत) (पृ.क्र. ३) प्रस्तावना
३५.	कित्ता, कोट्टरशेट्टी	सिद्धराम शिवयोगी, (पृ.क्र. ७७)
३६.	कित्ता,	(पृ.क्र. ७८)
३७.	स्वामी इरेश	श्री सद्गुरु महाशिवयोगी सिद्धराम पुराण, श्री महाशिवयोगी सिद्धेश्वर देवस्थान पुजारी हब्बू मंडळ, सोलापूर;२००१ (पृ.क्र. ४६)
३८.	कित्ता, लिगाडे	सिद्धरामाची त्रिविधी (पृ.क्र. ३) प्रस्तावना
३९.	कित्ता, कोट्टरशेट्टी	सिद्धराम शिवयोगी (पृ.क्र. ७८)

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

४०.	कित्ता, मडकी	शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत (पृ.क्र. ३६)
४१.	कित्ता,	(पृ.क्र. ३७)
४२.	कित्ता, श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी	श्री सिद्धरामेश्वर माहात्म्य (पृ.क्र. २०,२१)
४३.	कित्ता, मडकी	शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत (पृ.क्र. ६८)
४४.	कित्ता,	(पृ.क्र. ३८)
४५.	कित्ता, कोट्टरशेट्टी	सिद्धराम शिवयोगी (पृ.क्र. ७५)
४६.	कित्ता, मडकी	सिद्धरामेश्वर वचनांजली, (पृ.क्र. ५) प्रस्तावना
४७.	कुंभार आनंद	संशोधन तरंग, प्रभाकर देसाई, सोलापूर;१९८८ एप्रिल (पृ.क्र. ६५)
४८.	कित्ता, कोट्टरशेट्टी	सिद्धराम शिवयोगी (पृ.क्र. ७८)
४९.	कित्ता, कुंभार	किल्ले सोलापूर त्रुटी आणि पूर्ती, दै. लोकमत (मंथन) २००४ दि. ३० मे (पृ.क्र. ७)
५०.	कित्ता, कुंभार	संशोधन तरंग (पृ.क्र. ६८,६९)
५१.	वृषभेंद्रस्वामी एस. एम.	शासनगळल्ली सिद्धरामन वचनगळू, KUJ(H) Vol X १९६६ (पृ.क्र. १९३,२१४)
५२.	कित्ता, कुंभार	संशोधन तरंग (पृ.क्र. १४९)
५३.	कित्ता,	(पृ.क्र. १५०)
५४.	कित्ता	(पृ.क्र. १५१)
५५.	कित्ता, कोट्टरशेट्टी	सिद्धराम शिवयोगी (पृ.क्र. ७९)
५६.	नरसिंहाचार्य डी. एल.	सिद्धराम चरित्रे संग्रह, जयनगर, म्हैसुर; १९८४ (पृ.क्र. ६५,७२)
५७.	कित्ता, मडकी	शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत, (पृ.क्र. ७२)
५८.	पसारकर शें. द.	श्री सिद्धरामेश्वर वचने खंड-१, पंचकमिटी, सोलापूर; श्री सिद्धेश्वर देवस्थान; १९९८ (पृ.क्र. ११) प्रस्तावना
५९.	कित्ता, कोट्टरशेट्टी एम. बी.	सिद्धराम शिवयोगी (पृ.क्र. ७९)
६०.	कित्ता	(पृ.क्र. ८०,८१)
६१.	कित्ता, मडकी	शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत (पृ.क्र. ४९)

६२.	कित्ता, श्री देवस्थान पंचकमिटी	सिद्धरामेश्वर माहात्म्य (पृ.क्र. २९)
६३.	कित्ता, नरसिंहाचार्य डी. सी.	सिद्धराम चरित्रे संग्रह (पृ.क्र. २२)
६४.	कित्ता, थावरे दा. का.	शिवयोगी सिद्धरामेश्वर (पृ.क्र. ५१,५२)
६५.	कित्ता,	(पृ.क्र. ५४)
६६.	कित्ता,	(पृ.क्र. ५५)
६७.	कित्ता,	(पृ.क्र. ८२,८३)
६८.	कित्ता, मडकी	शिवयोगी सिद्धराम चरित्रामृत (पृ.क्र. ६५,६६)